रविवार, 11 सप्टेंबर 2022

किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

मराठी ● दैनिक

वर्ष - 02 ● अंक - 41

Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 11 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-41 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-8 ● PRICE-5


## गणपती बाप्पा मोरय्या पुढच्या वर्षी लवकर या...



## चर्चेतली बातमी



### रील स्टार सापडली, इटारसी रेल्वे पोलिसांनी घेतले ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आई वडीलांनी रागावल्यामुळे घर सोडून आजीकडे जातांना अल्पवयीन मुलगी इटारसी रेल्वे पोलिसांनी कुशीनगर एक्स्प्रेसमधून शनिवारी दुपारी 1. 30 वाजता इटारसी रेल्वेस्थानकावर ताब्यात घेतले, अशी माहिती भुसावळ रेल्वे पोलीस निरीक्षक विजय घेरडे यांनी दिली. ९ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वा. ती मुलगी वडील रागावल्यामुळे निघून गेली होती. याबद्दल तिच्या वडीलांनी बोलतांना सांगितले की, त्यांचे मेव्हणे घाटीमध्ये आजारी आहेत, त्यामुळे घरातील कामात मदत न करता ती उशीरा उठली. त्यामुळे तिला रागावलो व ती घर सोडून गेली. पण तिने अयोध्येला आजीच्या घरी आपण येत आहोत असे कळवले होते. ही माहिती घरच्यांना मिळाल्यावर छावणी पोलिस ठाण्याचे पीएसआय डाके यांना कळविले. त्यांनी छावणी पोलिस निरीक्षक शरद इंगळे यांनी पोलीस आयुक्त डॉ. निखिल गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलिसांची मदत घेत त्या मुलीचे लोकेशन ट्रेस केले. ते सारखे बदलत होते. त्यामुळे रेल्वे पोलीस अधीक्षक मोक्षदा पाटील यांच्याशी पोलीस आयुक्तांनी चर्चा केल्यानंतर भुसावळ रेल्वे पोलिसांना मोक्षदा पाटील यांनी तपासाचे आदेश दिले. तो पर्यंत कुशीनगर एक्स्प्रेस भुसावळहुन रवाना झाली होती. पोलीस निरीक्षक विजय घेरडे यांनी इटारसी रेल्वे पोलीस निरीक्षक बिभेंद्र व्यंकट टांडीया यांना संपर्क केला. एपीआय अनिता दास यांनी कुशीनगर एक्स्प्रेसची तपासणी करताच रील स्टार गर्ल दुपारी 1. 30 त्यामध्ये सापडली. पीआय टांडीया यांनी दुपारी पावणे 2.00 वाजता, भुसावळ रेल्वे पोलिसांना कळवले त्यांनी छावणी पोलिसांशी संपर्क करत मुलगी सापडल्याची माहिती दिली मुलीचे आईवडील तिला ताब्यात घेण्यासाठी इटारसीला रवाना झाले आहेत .

वरील कारवाई पोलीस आयुक्त डॉ, निखिल गुप्ता, पोलीस अधीक्षक मोक्षदा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गौतम पातारे, शरद इंगळे, पीएसआय डाके, भुसावळ रेल्वे पोलीस निरीक्षक विजय घेरडे यांनी पार पाडली, अशी माहिती पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांनी दिली.

## महत्त्वाची बातमी

### अतिवृष्टीग्रस्तांना राज्य सरकारकडून दिलासा!

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील अतिवृष्टीग्रस्त नागरिकांना शिंदे सरकारकडून दिलासा देण्यात आला आहे. राज्यात जून ते ऑगस्टदरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे आणि शेतजमिनीचे अतोनात नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी राज्य सरकारने ३ हजार ५०१ कोटी रुपये जिल्ह्यांना सुपूर्त केले आहेत. जिरायत शेतीसाठी प्रति हेक्टर १३ हजार ६०० रुपये, बागायत पिकांसाठी २७ हजार तर बहुवार्षिक पिकांसाठी प्रति हेक्टर ३६ हजारांची मदत सरकारकडून करण्यात आली आहे. तीन हेक्टरपर्यंत शेतजमीन असलेल्या शेतकऱ्यांना ही मदत केली जाणार आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद निधी आणि राज्य शासनाच्या निधीतून नागरिकांना हा आर्थिक दिलासा देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पूरग्रस्तांना वाढीव मदत दिली जाईल, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार मदत व पुनर्वसन विभागाकडून शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

अतिवृष्टी आणि पुरामुळे राज्यातील एकूण २३ लाख ८१ हजार ९२० हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. राज्यातील जवळपास २५ लाख ९३ हजार शेतकऱ्यांना या पुराचा फटका बसला आहे. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यातील १८ जिल्ह्यांमध्ये पुरामुळे अतोनात नुकसान झाले आहे. या भागातील १२ हजार ७८८ हेक्टर शेतजमीन उद्ध्वस्त झाली आहे.

## सर्वोच्च न्यायालयात भटक्या कुत्र्यांवर सुनावणी

### हल्ला केला तर त्यांना अन्न देणारे जबाबदार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : भारतात भटक्या कुत्र्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जाताना दिसत आहे. अनेक ठिकाणी या भटक्या कुत्र्यांनी माणसांवर हल्ला केल्याच्या घटनाही घडल्या आहे. परिणामी भटक्या कुत्र्यांना मारण्याबाबत विविध संस्थांनी आदेश दिले होते. या आदेशांविरोधात सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. विशेषत: केरळ आणि मुंबईत भटके कुत्रे धोकादायक बनले आहेत. या याचिकेवर न्यायालयात सुनावणी घेण्यात येत आहे. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती जेके माहेश्वरी यांच्या बेंट यांनी भटक्या कुत्र्यांबाबत महत्वपूर्ण सूचना दिली आहे.**

न्यायालयाने दिलेल्या सूचनेनुसार भटक्या कुत्र्यांनी माणसांवर हल्ला केला तर त्यांना अन्न देणारे जबाबदार असतील. तसेच या खंडपीठाने भटक्या कुत्र्यांच्या त्रासावर तोडगा काढण्याच्या गरजेवर भर देत भटक्या कुत्र्यांना नियमितपणे खायला घालणाऱ्या लोकांना श्वानांच्या लसीकरणासाठी जबाबदार धरले जाऊ शकते, असेही म्हणले आहे.

**लोकांची सुरक्षा आणि प्राण्यांचे हक्क यांच्यात समतोल राखण्याचे आदेश**

एवढचं नाही तर भटक्या कुत्र्यांनी लोकांवर हल्ला केल्यास या कुत्र्यांना अन्न देणाऱ्या व्यक्तींनाचं उपचाराचा खर्च उचलावा लागेल, अशी सूचनाही न्यायालयाने केली आहे. तसेच लोकांची सुरक्षा आणि प्राण्यांचे हक्क यांच्यात समतोल राखण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

**पुढील सुनावणी २८ सप्टेंबरला**

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती खन्ना म्हणाले की, आपल्यापैकी बहुतेकजण श्वानप्रेमी आहेत. मी कुत्र्यांना अन्न देतो. पण माणसांनी श्वानांची काळजी घेतली पाहिजे. . भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर तर्कशुद्ध तोडगा काढला पाहिजे, असेही न्यायमूर्ती खन्ना म्हणाले. सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही पक्षांना जबाब नोंदवण्याचे निर्देश दिले. सोबतच या प्रकरणाची पुढील सुनावणी २८ सप्टेंबरला घेण्यात येणार आहे.

भारतात २०१९ पासून १.५ कोटी पेक्षा जास्त प्राण्यांच्या चाव्याच्या घटनांची नोंद झाली आहे. उत्तर प्रदेश ( २७ लाख ५२ हजार २१८ ) त्यानंतर तामिळनाडू ( २० लाख ७० हजार ९२१ ), महाराष्ट्र ( १५ लाख ७५ हजार ६०६ ) आणि पश्चिम बंगालमध्ये( १२लाख ०९ हजार २३२ ) प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. दुसरीकडे, लक्षद्वीपमध्ये भटक्या कुत्र्यांच्या चावण्याच्या कोणत्याही घटनांची नोंद नाही.

**दरवर्षी १०० हून अधिक रेबीज प्रकरणे**

२०१९ मध्ये ७२ लाख ७७ हजार ५२३ प्राण्यांनी माणसांवर हल्ला केल्याच्या घटना घडल्या आहेत. तर २०२० मध्ये ४६ लाख ३३ हजार ४९३ घटनांची नोंद करण्यात आली. तर २०२१ मध्ये १७ लाख ०१ हजार १३३ घटनांची नोंद करण्यात आली. २०२२ सालाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये १४.५ लाखांहून अधिक लोकांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याचे समोर आले आहे. यावर्षी भटक्या कुत्र्यांनी माणसांना चावल्याची सर्वाधिक प्रकरणे तमिळनाडूमध्ये नोंदवण्यात आली आहेत. तर महाराष्ट्रात २ लाख ३१ हजार ५३१ प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. भारतात दरवर्षी १०० हून अधिक रेबीज प्रकरणे आणि मृत्यूची नोंद होते.

## पेसा आदिवासींच्या ५० टक्के आरक्षणासाठी उच्च न्यायालयात याचिका

### ट्रायबल फोरम: स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक, कायद्याची अवहेलना

आधुनिक केसरी न्यूज

राहुल वासनिक


यवतमाळ : अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थेत आदिवासीं बांधवासाठी पेसा कायदा १९९६ च्या ४ (छ) आणि संविधानातील तरतुदींनुसार आदिवासी सदस्यांच्या किमान ५० टक्के जागा राखीव ठेवणे बंधनकारक असतांना राज्यात त्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात ट्रायबल फोरम यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष अंकित नैताम यांनी याचिका दाखल केली आहे. संविधानातील पाचव्या अनुसूची नुसार राज्यातील १३ जिल्ह्यात २३ तालुके पूर्णतः आणि ३६ तालुके अंशतः महामहिम राष्ट्रपतींनी २ डिसेंबर १९८५ रोजी घोषित केलेल्या अनुसूचित क्षेत्रात येतात.पंचायत संबंधी तरतुदी संविधान ( ७३ वी सुधारणा )अधिनियम १९९२ संविधानात समाविष्ट केलेल्या आहेत.पेसा कायदा १९९६ च्या पॅरा ३ आणि ४ नुसार संविधानात काहिही असले तरी पंचायती संबंधी पेसा कायद्यातील तरतुदींशी विसंगत कायदा करणार नाही. पेसा कायदा कलम ४(छ) नुसार अनुसूचित क्षेत्रातील पंचायतीमधील जागांचे आरक्षण हे त्या पंचायतीमधील आदिवासींच्या लोकसंख्येच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणात राहायला पाहिजे. परंतू अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट असलेल्या पंचायतीमधील जागांचे आदिवासींसाठी असलेले आरक्षण जागांच्या एकूण संख्येच्या निम्म्या पेक्षा कमी असणार नाही आणि सर्व पातळीवरील पंचायतीच्या सभापतीच्या सर्व जागा आदिवासींसाठी राखीव असायला पाहिजे. एखाद्या पूर्णतः अनुसूचित क्षेत्रातील पंचायतीमध्ये ५० टक्के पेक्षा कमी अनुसूचित जमातींची लोकसंख्या असेल तरी त्या पंचायतीमध्ये ५० टक्के सदस्य आदिवासी असतील. तसेच त्या पंचायतीमध्ये सरपंच किंवा सभापती किंवा अध्यक्ष आदिवासी असतील. निवडणूक आयोग ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या राखीव व खुल्या पदांच्या जागा महाराष्ट्र निवडणूक कार्यक्रमानुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १०,महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियम १९६१ मधील कलम १२,पोटकलम २ चा खंड (ग) अनुच्छेद २४३ झेड ,२४३ झेड ए अन्वये घेण्याबाबत कळवितात.आणि अनुसूचित क्षेत्रातील पंचायत समिती ( अंशतः अनुसूचित क्षेत्रातील पंचायतीसह )व जिल्हा परिषदेसाठी लोकप्रतिनिधीची पदे अनुसूचित जमातीसाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा १९६१ च्या कलम १२ (२) ( बी ) आणि ५८ (१ -बी) नुसार चक्रानुक्रमे ( रोटेशन ) पद्धतीने आरक्षण सोडत काढतात .या रोटेशन पद्धतीमुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदसाठी पारित झालेल्या पेसा कायद्याच्या कलम ४ (जी ) च्या परन्तुकाच्या तरतुदींचे उल्लंघन होते. चक्रानुकमे पद्धतीमुळे अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्यांच्या जागा वेगवेगळ्या प्रभागात, गटात, गणात किंवा वार्डात विभागल्या जातात. म्हणून प्रभाग किंवा गण किंवा गटात रोटेशन पद्धत न ठेवता त्या जागा आदिवासींसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव ठेवून बिगर अनुसूचित क्षेत्रात फिरते आरक्षण आळीपाळीने आरक्षित ठेवण्यात यावे. ग्रामपंचायत अधिनियम १९५८, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ हे संसदेने पारित केलेल्या पेसा कायद्याला वरचढ ठरत नाहीत. याचिका कर्त्यातर्फे अॅड.शौनक कोठेकर काम पाहत आहे.

### उच्च न्यायालयाचे वेधले लक्ष

सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा १९६१ चे निवडणुका संबंधीचे कलम १२(२)(सी) संबंधात तसेच संविधान अनुच्छेद २४३ डी,२४३ टी, १४ आणि १६ नुसार निर्णय दिला असल्याने संविधान भाग ९ आणि संविधान भाग ९ क मधील सर्वच स्थानिक स्वराज्य संस्था मधील आरक्षण रिव्ह्यू करणे आवश्यक आहे. न्याय न मिळाल्यामुळे उच्च न्यायालयात धाव महामहिम राष्ट्रपती यांनी अनुसूचित क्षेत्राची घोषणा करुन ३६ वर्षे उलटून गेली. तरीही राज्यात पेसा कायद्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. परिणामतः महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मध्ये योग्य सुधारणा झालेल्या नाहीत. याबाबत राज्यसरकारला आणि पेसा क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेत ५० टक्के आरक्षण व रोटेशन पद्धत थांबविण्यासाठी महाराष्ट्र निवडणूक आयोग यांना पत्रव्यवहार करण्यात आला.परंतू समाधानकारक उत्तर व न्याय न मिळाल्यामुळे उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

अंकित नैताम जिल्हा उपाध्यक्ष,ट्रायबल फोरम यवतमाळ

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# शाश्वत शिक्षणाची गंगोत्री...

आधुनिक केसरी

या शाळेत प्रत्येक वर्गात साधारण २२ ते २५ मुले आहेत. त्यांच्यासाठी एक शिक्षक. मुख्याध्यापक नाही. शिक्षकांना मुख्याध्यापकांचे आणि विद्यार्थ्यांना शिक्षकांचे बॉसिंग नाही. धाक, दडपण,भीती यापासून मुक्त असलेली ही शाळा आणि तिथली मुले. जणू रवींद्रनाथ टागोरांच्या कवितेतील ' स्वातंत्र्याचा स्वर्ग ' इथे अवतरलेला. मुले प्रयोगातून शिकतात. शिक्षक त्यांना शिकण्यासाठी मदत करतात. के जी ते १० वी पर्यंत ही शाळा सध्या आहे. मुलांना शिकण्यासाठी प्रोजेक्टच असे दिले जातात की मुले जीव ओतून ते पूर्ण करतात. ते पूर्ण करता करता शिकतात. येथील प्रयोगशाळेत मुले स्वतः प्रयोग करतात. मोठ्या वर्गातील मुले लहान वर्गातील मुलांना शिकण्यासाठी मदत करतात. मुलांवरच जबाबदारी टाकल्याने ती जबाबदारीनेच वागतात.



या शाळेतील के जी च्या मुलांच्या वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन ९ वी च्या विद्यार्थ्यांनी केले. अगदी कार्यक्रमासाठी हॉल बुक करण्यापासून ते पालकांना निमंत्रण देण्यापर्यंतचे सगळे नियोजन त्यांनी केले. मी एका दुसरीच्या वर्गात गेलो. तेथील विद्यार्थ्यांना पाणी या विषयावर अभ्यास करायला सांगितले होते. पण पाणी या शब्दाऐवजी त्यांना एच टू ओ हा शब्द कार्यासाठी दिला होता. या विषयावर फक्त दुसरीत असलेल्या त्या विद्यार्थ्यांनी अक्षरशः प्रचंड माहिती गोळा केली होती. ती मुले मला ती समजावून सांगत होती. इंग्रजीत लिहिलेली ती माहिती खडानखडा वाचून दाखवीत होती. मी मुद्दामच मला काही कळले नाही असे दाखवले. त्या मुलांनी मग मला ती माहिती मराठीतून सांगितली. पाणी किती मौल्यवान आहे हे त्या मुलांना कळले होते. आता त्यांना पाणी जपून वापरा हे सांगावे लागणार नव्हते. हे खरे शिक्षण.

व्हरांड्यात काही पाचवीची मुले शिष्यवृत्ती परीक्षेची प्रश्नपत्रिका सोडवीत बसली होती. ती शांततेने आपली उत्तरे लिहीत होती. येत नाही म्हणून शेजारच्या मुलाला विचारत नव्हती. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे तेथे कोणीही शिक्षक उपस्थित नव्हते. त्यांना पर्यवेक्षणाची गरज नव्हती. **(क्रमशः)**

## आनंदी पहाट



# प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी

आधुनिक केसरी

मानसिक स्वास्थ्य हे आपल्या भावनात्मक, कौटुंबिक आणि सामाजिक बाबींशी निगडीत असते. आपण कसा विचार करतो, अनुभवतो आणि कृती करतो? यावर ते अवलंबून असते. अनेकदा नकळत आपल्या अंतर्मनावर ताण येत असतो, तो जाणवत नाही आणि म्हणूनच कळतही नाही. अशावेळी आपल्या क्रिया आणि प्रतिक्रिया अनावधानाने बदलत जातात. त्यामुळे घेतलेले निर्णय आणि त्या दरम्यान इतरांशी होणारे आपले संवाद काहीवेळा विपरीत परिणाम करणारे ठरू शकतात. यासाठीच जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर अगदी बालपणापासून वृद्धार्पणापर्यंत मानसिक स्वास्थ्य महत्वाचे आहे. आपल्या जीवनात आपण मानसिक स्वास्थ्यविषयक समस्यांचा सामना करत असतो. त्यामुळे आपली विचारसरणी, अंतर्मनाची भावना आणि वागणूक ह्या सर्वांवर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही. आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते. आनंद प्राप्ती म्हणजेच खरी यशप्राप्ती असते; हे ज्या व्यक्तीला समजते, त्याच व्यक्तीला त्याच्या जीवनातले सार कशांत आहे, हेही कळू शकते.

आपल्या मनांत येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची आपल्याला सतत जाणीव होणे आवश्यक असते.

## संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-38

# भीजपाऊस...

आधुनिक केसरी

भिजपाऊस आणि मुसळधार पाऊस यात खूपच फरक आहे. मुसळधार पाऊस येतो जमिनीवर वरवर पडतो व वाहून जातो आणि भिज पाऊस बारीक-बारीक पडतो. फक्त अंगावरचे कपडे ओले होतात. कपड्यातून कधी कधी आतही जात नाही. पण जमिन मात्र खोलवर ओली होत असते. आधी मुसळधार पाऊस पडलेला असतो. वरची माती ओली असते. भिज पावसाने ती आतून ओली होते. खोलवर ओलसरपणा येतो व पीक चांगले येण्यास मदत होते. तसेच विचारांचेही आहे. एखादा वक्ता एक तासभर फाडफाड बोलतो. निघून जातो. मुसळधार पावसासारखे त्याचे विचारही मनात खोलवर रुजत नाही .पण आई-वडील शिक्षक हे भिज पावसासारखे संस्कार करतात. विचार रुजवतात, खोलवर जाणारे, चिरकाल टिकणारे. पाऊस हा कुठेही पडतो. खडकावर, जमिनीवर. ढग पूर्ण भरले त्यांना ओझं झाले की पाऊस पडतो .विचारांचेही तसेच आहे .भरपूर चांगले विचार डोक्यात साचले की ते इतरांनाही द्यावेसे वाटतात. आणि ते दिलेच पाहिजे. पवित्र ज्ञानदानाचे ते कार्य आहे. चांगलेच विचार इतरांना द्यावे. अगदी चाळणीतून गहू चाळतो तसे. ऋतुचक्रासारखे विचार येतात, जातात. जुने विचार टाकून द्यावे. आवश्यक ते घ्यावे. नव्या विचारांचे स्वागत करावे. विचारांचा हा भिज पाऊस सतत चालू ठेवावा. चांगले पीक जसे जमिनीत काढतो तसे चांगले विचारही डोक्यात सतत निर्माण करूया. मुसळधार पावसाने जशी जमीन स्वच्छ होते. तसे चांगल्या विचाराने मन स्वच्छ होते. चिंतन मनन सतत करावे. साहित्यिकाच्या डोक्यात चांगले विचार येतात तेव्हा ते निश्चितच लेखन रूपाने समाजापर्यंत पोहोचवतात. असेच मुलांना दोन्ही पावसात व विचारात भिजवूया...

# सोशल मीडिया आणि आजचे विद्यार्थी

आधुनिक केसरी

सध्याची पिढी आई-वडिलांना पेक्षाही आणि गुरूपेक्षा हे स्क्रीनवर प्रेम करणारी आहे. त्यात टीव्ही, मोबाइल, लॅपटॉप, कॉम्प्युटर ही सर्व स्क्रीन आली. सध्या तर शाळा बंद .म्हणजे आणखीनच स्क्रीनचा वापर वाढणार यात शंका नाही.मात्र प्रश्न येतो मुलं स्क्रीनवर काय बघता?( खर तर हा संशोधनाचा विषय आहे. )आजमितीस टीव्ही वरती 24 तास बीभत्स हावभावात गाणी दाखवणारे भरमसाठ चॅनल्स आहेत. (अर्थात ते पहावं की नाही हा प्रत्येकाचा प्रश्न आहे.) त्याच त्याच बातम्या दिवसभर मसाला लावून सांगणारे (सर्वच नाही) चॅनल आहे. हॉलीवुड ,बॉलीवुडचे चित्रपट दाखवणारे असंख्य चांगले आहेत. मुलांनी ठरवलेलं असतं कोणत्या वेळी कोणते चॅनल्स बघायचे.म्हणजे सर्वच घरी सर्व असल्यावर काय बघायचं? आणि एकट असल्यावर काय बघायचं ? कारण मुल जिज्ञासु असतात. प्रत्येक विषयाची त्यांना जिज्ञासा असते. एवढे सगळे चॅनल्स आहेत, मात्र आज गरज आहे. कायमस्वरूपी देशभक्ती मुलांच्या मनात रुजवणाऱ्या चॅनलची .असं एखादं चॅनल हवं की त्यावर 24 तास देशभक्तीपर आधारित चित्रपट, गाणी ,नाटिका, नाट्यरूपांतरे दाखविली जावीत .मुलांमध्ये प्रेरणा निर्माण व्हावी म्हणून क्रांतीकारकांचे विचार मांडणाऱ्या एखाद्या पुस्तकाचं वाचन. महापुरुषांच्या यशोगाथा, प्रशासकीय सेवेतील कर्तव्यदक्ष अधिकारी, त्यांच्या बालपणातील संघर्ष. त्यांच्याशी निगडित कथा .आदर्श गावे ,आदर्श शाळा, आदर्श म्हणून जे जे असेल ते ते त्या चॅनलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे. जेणेकरून मुलांमध्ये सकारात्मक बदल होईल .या चॅनलच्या जाहिरात प्रत्येक चॅनलवर दाखविली जावी. नव्हे सर्वच चॅनल्सला ते बंधनकारक करावं.जेणेकरून चॅनल विषयी माहिती मिळेल आणि लोकांची उत्सुकता वाढेल. सध्याच्या लॉक डाऊन च्या काळात असे चॅनल म्हणजे देशवासीयांसाठी एक पर्वणीच होईल. त्यातून राष्ट्र उन्नतीला निश्चितच हातभार लागेल .चालना मिळेल .आणि समाजामध्ये गुन्हेगार निर्माण होण्याऐवजी देशभक्त निर्माण होतील.

-किरण निकम, बजाजनगर, औरंगाबाद

# "निरुपण"

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**दिग्घस्तिभिःकनककुम्भमुखावसृष्ट-**
**स्वर्वाहिनीविमलचारुजलप्लुताङ्गीम् ।**
प्रातर्नमामिजगतां जननीमशेष-
लोकाधिनाथगृहिणीममृताब्धिपुत्रीम् ॥१६॥

दिग्गजांनी सुवर्ण कलशाच्या मुखांनी आवर्षित आकाशगंगेच्या निर्मल आणि मनोहर जलाने ज्यांच्या श्रीअंगांचा अभिषेक केला जातो, संपूर्ण लोकांचे अधीश्वर, भगवान विष्णूंच्या गृहिणी, क्षीरसागरकन्या, त्या जगज्जननी लक्ष्मीला मी प्रातःकाली प्रणाम करतो.

## ।। दासबोध स्तवन ।।



# सगुणभजन

आधुनिक केसरी

या भावनेने वागले तर भगवंत आपल्याला आशिर्वाद देतो. भगवंत शाश्वत आहे त्याच्या पेक्षा आपले जीवन किती अल्प आहे. भगवंताची महती किती मोठी त्या मानाने मी किती लहान आहे याची जाणीव ठेवावी. कितीही मोठे झाले तरी उपासना सोडू नये. मी तर असेही वाचले आहे की "भारतरत्न सचिन तेंडुलकर " व त्याचे कुटुंबातील सदस्य मनाचेश्लोक म्हणतात. म्हणजेच सर्वोच्च स्थानात पोहचला तरी आपल्या गुरूंना विसरू नये. खरें म्हणजे उपासनेने दृश्याचें मिथ्यापण लक्षात येते आणि आपली देहबुद्धी संपते.ती संपू नये म्हणून देहाला उपासना लावावी आणि विवेकाने "मी "पणा मारावा किंबहुना तो संपवून अध्यात्माची कास धराली की खरे आत्मज्ञान उदय पावते. शेवटच्या पाच ओव्यात समर्थ काय उपदेश करतात ते आता पाहूयात. या प्रचंड विश्वामध्ये भगवंत सर्व व्यापी आहे. भगवंताच्या शक्तिने आपण कार्य करतो,जगतो कर्म करतो आपल्या वाट्याला आलेले चांगले वाईट भोग भोगतो आपली नितीमत्ता चांगली असेल तर वाईट परिस्थिती आली तरी त्याच्यावर मात करून चांगले ध्येय गाठतो. (क्रमशः)



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# मैत्र जीवांचे!

आधुनिक केसरी

देवाला जाताना फुले,फळे,पेढे, पैसे घेऊन जातात.जे त्यानेच दिले आहे तेच त्याला अर्पण करतात.पण स्वतः चे समर्पण मात्र बाजूलाच ठेवतात.जे खरे महत्वाचे असते.मीच तुझा आहे,जे माझे आहे ते तुझे आहे. हा भाव नसतो मनात.पण हे मला माहीत आहे आणि अनुभवले पण आहे.मी तुझी झाले ,यात नवलाईचे नाही .त्यात अपूर्वाई ही नाही.मी तुझ्यासाठी तर होते. मी वेगळे काहीच नाही केले.त्यात माझे दातृत्व शून्य.जे तुझे होते ते तुझे झाले .बस,एवढेच.

तसे तुझ्याआधी,व तुझ्या नंतरही कुणी कुणी डोकावलेच की माझ्या मनात.पण फक्त डोकावले. स्थिर नाही करू शकले कुणीच स्वतः ला.मीही स्थिर नाही राहू शकले तुझ्या इतकी कुणातच.कारण ती जागा आरक्षित होती तुझ्यासाठी खास. फक्त तुझ्यासाठी .कायमची.

तसे काहीच दिवस ते, काहीच क्षण ते.लगेच बदलल्यासारखा वाटलास तू.प्रामाणिकतेचा थोडा अभाव जाणवला मला.कदाचित तो तसा भासला असेल मला त्यावेळी.पण उखडले गेले पुन्हा आतून.नको त्या वाटा चोखाळते आहे असे वाटले .भेटण्याची,बोलण्याची जबरदस्ती करण्याचा प्रश्नच नव्हता.तुझ्या उदासिनतेची कारणं मी माझ्यातच शोधत बसले.काही कमतरता होत्याच माझ्यात.तर काही जादाच्या ही गोष्टी होत्या माझ्यात. निसर्गदत्त .कदाचित त्याच रूचल्या नसतील तुला.पण मग मीच स्वतः ला आवरत राहिले,सावरत राहिले.मी तुझी होऊन राहण्यापासून कोण रोखणार होते मला?तुला तरी शक्य होते का ते तेव्हाही आणि आजही?.त्यासाठी तू माझा असावास हे गरजेचे नव्हतेच मुळी.समजूत घालत गेले मनाची.आणि वेगळ्या वाटेला लागले.जी तुझ्याकडे कधी फिरकणार ही नव्हती.

आता परतीच्या वाटा ठळक दिसतायत.तरी मनात तुझा वेढून राहिलेला मोह जसाचे तसा आहे.मेरू पर्वतासारखा मधेच उभा.त्याला दुर्लक्षित करणे शक्य नाही मला.पण अगतिक ही नाही मी.जिथे सगळे पाश संपतात तिथेही तू असशीलच.थोडा तुझ्यासाठी ,थोडा माझ्यासाठी.

व्याकूळ,व्याकूळ होऊन जाते मन कधी कधी.डोळ्यात खुपल्या सारखं होतं थोडं.आणि डोळ्यांचा कब्जा पाणी घेत.एक पातळ अस्तर तयार होत तिथे.पण ते तिथेच थबकते.कसल्याशा जाणिवा ठाण मांडून बसतात मनात.मलाच का असं व्हावं?असा प्रश्न ही उभा राहतोच मनात.पण या सगळ्याची फक्त मीच स्वामींनी आहे .हीही एक जमेची बाजू उभी राहते मनात.पण तरी आतड्याला पीळ पडतोच कुठेतरी.ती कासाविशी जीवघेणी विसर पाडायला लावते सगळ्याच गोष्टींचा.

तू या सगळ्यातून बाहेर पडला असशील.किंवा या गोष्टीना सामोरे जाण्याचे तुझे मार्ग भिन्न असतील.ते मार्ग तुझे तुला लखलाभ.पण या सगळ्यात तू होतासच ही धारणा का मी करून घेते स्वतः ची? अपेक्षा तरी का करीत राहते तशी?अगदी सर्वसामान्य,सहज तर गोष्टी होत्या त्या तशा.काही जुजबी संवाद.त्यापैकी हाही एक .सहज जाता जाता तुला म्हणाले,"मला अरे तुरे म्हटले तरी चालेल"मला मी उगाचच नसलेली मोठी झाल्यासारखे वाटले होते म्हणून तसे म्हणालेहोते मी तुला. दुसरे काहीच नव्हते मनात खरोखरच तेव्हा. त्या सगळ्या गोष्टींपासून लांब रहायचा दृढनिश्चय होता माझा.पण त्यानंतर काहीच दिवसांनंतरची ती घटना.तू कुणालातरी माझे नाव घेऊन काही तरी सांगत होतास.मी लांबून ऐकत होते,पहात होते.तुझा असा चेहरा फुलला होता की ते पाहून मीही आतून फुलायला लागले नकळत.कपारीतून कोवळे कोंब बाहेर पडावेत इतका त्यांचा तो खडतर प्रवास होता.

त्यानंतर तुझ्या त्या खास"तिचे "लग्न ठरले .तिची पत्रिका हातात घेऊन दाखवायला आलास.दुःखाची गोणी नेमकी माझ्याच जवळ उतरवावी वाटली तुला. एक नातं आकार घेत असताना दोघेही आपण अचंबित होऊन नुसते पहात राहिलो.तसे पाहिले तर दोघेही आपण दोन टोकाचे.मी वर्ग की लगेच लायब्ररी.तर तू सतत अवांतर ठिकाणी.पण वाचन हा एक दुवा होताच आपल्यात .पण मग तू कधीतरी चुकून लायब्ररीत डोकावून लागलास .तर मी त्या अवांतर ठिकाणी डोकावू लागले.मग मलमपट्याची गरजच नाही उरली कुणाला.एक सतत अंतर होते तुझ्या माझ्यात .पण मनाची अंतर मला वाटते मिटली होती तेव्हा.

पण आता हे मी का बरे आठवते आहे सगळे? आणि तेही या परतीच्या वाटेवरून चालताना.गोगलगाई पुढे जाताना एक चिकट द्रव सोडत जातात. मागाहून येणारांना मार्ग सापडावा म्हणून.तसा तर माझा उद्देश नसावा ना?तो चांदण्यांचा शीतल शिडकावा आठवला तरी दाहच होतो आता शरीराचा.खरे तर मलाही तो दाह तुझ्या प्रमाणेच तुझ्या कुशीत शिरून निववायचा होता एकदा.पण नाही.जीवनमूल्यांना तेही नसावे मान्य माझ्या.तेही स्विकारले आहे आता.तिच मशाल घेऊन चालत राहू.नुसते चालत राहू.अखेरपर्यत आता.



सौ. शुभदा कुलकर्णी
संपर्क क्र. 9421214708

काशीला गेल्यावर गंगेत न्हाताना आवडती गोष्ट सोडतात म्हणे.ते क्षण म्हणजे माझ्या आयुष्यातील काशी.त्या कालगंगेत न्हाताना दिवसाची सुरुवात करणार्याच काही गोष्टी उदा. चहा,कॉफी सोडून दिल्या.

अंतर्मनात मैलोनमैल तू पसरलेला असतोस पण प्रत्यक्षात मात्र सुईच्या टोकावर बसेल एवढीही जागा नसते तुझ्यासाठी.लहानपणी ओझर्ड्याची सोंगे पहायला जायचो ते आठवते .पहाटे पहाटे निघायची.उजाडले की सोंगे संपायची.तशीच पहाटे स्वप्नात रंगून जाते. बेमालूमपणे त्या भूमिका रंगवते.पण डोळे उघडले की गुडूप होऊन जाते ती भूमिका. पण त्या स्वप्नातील अनुभूती जगण्याचे बळ द्यायला पुरेशा असतात.

परवाच अरूंधती यांचा लेख वाचला. अंकुली या झाडाविषयीचा.त्याची फळ खाली पडतात पशू पक्षी ती खातात.बिया इकडे तिकडे पडलेल्या असतात.पण पहिला पाऊस आला की त्या झाडाला पुन्हा जाऊन चिकटतात.पुन्हा तिथेच रूजतात. आतला आपलेपणा नाही विसरता येत त्यांना.आपले तसेच नाही का चालले?लिहिण्यासाठी भावना, शब्द ही इतरत्र भिरभिरत राहतात .पण लिहिताना फक्त तुझ्याभोवतीच स्थिर होतात.हे जीवांचे मैत्र कधीच न संपणारे आहे इतकेच काय ते खरे..आहे.

# सप्तश्रृंगी देवीच्या मूर्ती संवर्धनानंतर मूळ रूप समोर

आधुनिक केसरी न्यूज





**शिरवाडे वाकद :** साडेतीन पीठांपैकी आध्य पीठ असलेल्या नाशिक जिल्ह्यातील सप्तश्रृंगी देवीच्या मूर्ती संवर्धनांतर मूळ रूप समोर आले आहे.

सप्तशृंगी देवीची मूर्ती संवर्धन व देखभाल कामकाजामुळे दीड महिना मंदिर बंद ठेवण्यात आले होते. त्या अनुषंगाने मूर्ती संवर्धन व देखभालीचे काम पूर्ण झाले असून भगवतीच्या मूळ रूपाचं दर्शन होत आहे. देवीच्या मूर्तीवरून अकराशे किलो शेंदूर काढण्यात आल्यानंतर आई सप्तशृंगी देवीचे मूळ रूप पहिल्यांदाच समोर आले आहे. भगवतीचे मूर्ती संवर्धन आणि देखभाल करण्यासाठी मागील ४५ दिवसापासून मंदिर दर्शनासाठी बंद असून मूर्ती संवर्धनाचे काम पूर्ण झाले आहे. यामध्ये मूर्ती संवर्धनाच्या कामानंतर आई भगवतीच्या रूपात झालेला मोठा बदल पाहायला मिळत आहे. मूर्तीचा कायापायलट झालेला दिसून येत आहे. मूर्ती संवर्धन प्रक्रिया सुरू केल्यानंतर भगवतीच्या स्वरूपावरील मागील कित्येक वर्षांपासून साचलेला शेंदूर लेपनाचा भाग कवच हा धार्मिक व शास्त्रोक्त पद्धतीने काढण्यात आला आहे. दि.६ ते ८ सप्टेंबर दरम्यान धार्मिक पूजा हवन विधीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर पितृपक्षात सर्व भक्तांच्या कल्याणासाठी १६०० देवी अथर्वशीर्ष पठण अनुष्ठान नवरात्री पूर्वी होणार आहे. दि.२६ सप्टेंबर घटस्थापनेपासून देवी मंदिर दर्शनासाठी खुले होणार आहे. त्यामुळे घटस्थापनेला सप्तशृंगी मातेच्या मूळ रूपाचं दर्शन सर्व भाविकांना घेता येणार आहे. त्यासाठी भाविकांनी व्यवस्थापनास योग्य सहकार्य करावे, असे आवाहन विश्वस्तांच्या वतीने करण्यात आले आहे. श्री भगवतीची मूर्ती जवळपास १० फूट उंच व आठ फूट रूट आकारात व एकूण १८ हातांत भिन्न प्रकारातील अस्त्र व शस्त्र असून, त्यात उजव्या हातात (खालील बाजूकडून वरील बाजूकडे अक्षरमाला, कमल, बाण, खडग, वज्र, गदा, चक्र, त्रिशूल, परशू, तर डाव्या हातात (खालील बाजूकडून वरील बाजूकडे कमंडलू, पानपात्र, धनुष्य, चर्म, कालदंड शक्ती, पाष, घंटा, शेख आहे. ही शस्त्र-अस्त्र विविध देवदेवतांची प्रतीके असल्याचे म्हटले जाते. श्री भगवतीची मूर्ती अतिप्राचीन व विश्वातील एकमेव भव्य आकार व प्रकारातील ती एकमेव स्वयंभू मूर्ती आहे. वर्षानुवर्षे त्यावर शेंदूर लेपन सुरु आहे. तसेच सप्तश्रृंग गडावरील वातावरण, देवीच्या डोंगरावर असलेले मंदिर व त्यातून होत असलेले पाण्याचे झिरपणे यामुळे मूर्तीच्या काही भागांत क्षती पोहोचत असल्याचे पुजारी वर्गाच्या लक्षात येवून पुरोहितांनी सन २०१२ – २०१३ मध्येच विश्वस्त मंडळाकडे मूर्ती संवर्धनाची मागणी करीत पाठपुरावा केला होता. त्यानूसार सप्तशृंगी निवासनी देवी ट्रस्टने सर्व पुरातत्व विभाग, आयआयटी पवई यांचे अहवाल व प्रशासकीय परवानगीने पुरातत्व विभागाची मान्यता असलेल्या अंजिक्यतारा कन्सल्टंसी, नाशिक या संस्थेमार्फत संवर्धनाचे काम सुरु केले होते. श्री भगवती स्वरूप श्री सप्तशृंगी निवासिनी देवी मूर्ती संवर्धन हे अतिशय काळजीपूर्वक पुरातत्त्व संकेतानुसार व निर्धारित कालावधीत मे अजिंक्यतारा कन्सल्टंट्स नासिक यांनी पूर्ण केले आहे. सदरचे काम आर्कि. स्मिता कासार पाटील (व्यवस्थापकीय संचालक व मुख्य संवर्धन वास्तु विशारद) यांच्या नेतृत्वाखाली व डॉ मॅनेजर सिंग (तज्ञ संचालक व मुख्य संवर्धक), इंजी योगेश कासार पाटील (संचालक व संवर्धक) यांच्या मार्गदर्शनाखाली किशोर सोनवणे (मुख्य मूर्तिकार), सतीश सन्नानसे (संवर्धक व कारागीर), समाधान आमले (संवर्धक व कारागीर), प्रकाश ठाकरे (सहाय्यक मूर्तिकार), इंजी गौरव ठाकरे (कार्यालयीन समन्वयक), धनंजय पळसेकर (सहाय्यक) इंजि सिद्धांत वाजे (सहाय्यक) या संघाने केले.

# भारतीय सण-उत्सव हीच भारताची ओळख : स्नेहल आडे

आधुनिक केसरी न्यूज



**अंबाजोगाई :** कै. दे. बा. ग. यो. नू. विद्यालय प्रा. विभाग मेडिकल परिसर येथे "बाल गणेश व्याख्यानमाले" चे सहावे पुष्प गुंफण्याच्या कार्यक्रमानिमित्त प्रथमतः पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वर्गशिक्षक श्रीनिवास वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली 7 वी (ब) च्या विद्यार्थ्यांनी बाल गणेश व्याख्यान मालेचे सहावे पुष्प गुंफण्यासाठीच्या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. यावेळी विचार पिठावर मुख्याध्यापक खंडेराव नांदगावकर सर , विभाग प्रमुख राजा ठाकुर सर, कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवहार ढगे सर, प्रमुख अतिथी व व्याख्यात्या मा.सौ. स्नेहल आडे मॅडम, शिक्षक प्रतिनिधी अ.स.आखाडे सर उपस्थित होते. यावेळी वर्गशिक्षक श्रीनिवास वैद्य, प्रसिध्दी प्रमुख व्यंकटेश चामनर सर, सांस्कृतिक प्रमुख मा.सौ.संध्या जोशी मॅडम यांच्या सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आजचे व्याख्यात्या मा.सौ.स्नेहल आडे मैडम यांचे "मराठी सण-उत्सव व त्यांचा वैचारिक वारसा" या विषयावर सखोल व अनेक उदाहरणासह अभ्यासपूर्ण असे व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवहार ढगे सर यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. योगिता कांबळे हिने केले. तर कु.राजनंदीनी पांचाळ हिने आभार मानले. 2022-23 बाल गणेश व्याख्यान मालेच्या समारोप प्रसंगी शाळेच्या सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख मा.सौ. संध्या जोशी मॅडम यांनी व्याख्यानमालेत सहभागी झालेले सर्व सन्माननीय व्याख्याते, शाळेचे मुख्याध्यापक, विभाग प्रमुख, सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी यांचे सांस्कृतिक विभागाच्या वतीने आभार मानले.

# मुख्यालयी न राहणाऱ्या शिक्षकांचे पगार थांबवा: आ. प्रशांत बंब

आधुनिक केसरी न्यूज




**गंगापूर :** खुलताबादचे भाजपचे आमदार प्रशांत बंब यांनी मुख्यालयी न राहणाऱ्या शिक्षकांविरुद्ध सुरू केलेली मोहिम मार्गस्त लागली असून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गटशिक्षण अधिकाऱ्यांनी मुख्यालयी न राहणाऱ्या शिक्षकांना नोटीस बजावली असून यामध्ये घरभाडे आणि वेतनवाढ रोखण्याचा इशारा दिला आहे. परंतु आमदार बंब यांचे एवढ्यावर समाधान झालेले दिसत नाही, त्यामुळे त्यांनी आणखी एक पत्र पाठवत मुख्यालयी न राहणाऱ्या शिक्षकांचे वेतनच रोखा अशी मागणी केली आहे. शिक्षकांनी मुख्यालयी राहण्याऐवजी बंब यांच्या विरोधातच उद्या मोर्चा काढण्याची तयारी सुरू केली आहे यावर शिक्षकांना मोर्चा काढणे शोभत नाही, ही मुजोरी जनतेला आवडणार नाही,असा टोला देखील बंब यांनी शिक्षकांना लगावला आहे. पावसाळी अधिवेशनात शिक्षकांच्या मुख्यालयी न राहता फुकट घरभाडे घेण्याचा मुद्दा आमदार बंब यांनी उपस्थितीत केला होता. त्यानंतर संतप्त झालेल्या शिक्षकांनी बंब यांच्याविरोधात आघाडी उघडली होती.संघटनाचा दबाव, निदर्शने, आंदोलने केल्यानंतर बंब शांत बसतील असा त्यांचा अंदाज होता. पण उलट बंब अधिक आक्रमक झाले आणि त्यांनी शिक्षकांसह त्यांना पाठिशी घालणाऱ्या शिक्षक व पदवीधर आमदारांच्या विरोधात देखील आक्रमक पावित्रा घेतला. बंब यांच्या भूमिकेला समाजातून देखील पाठिंबा मिळत आहे आणि प्रशासनाने देखील त्याची दखल घेत मुख्यालयी न राहणाऱ्या शिक्षकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. घरभाडे रद्द करण्याचा इशारा शिक्षण विभागाने दिल्यानंतर बंब यांनी आता त्याच्या एक पाऊल पुढे जात अशा शिक्षकांचे ते जोपर्यंत मुख्यालयी राहत नाहीत, तोपर्यंत पगारच रोखा, अशी मागणी केली आहे. त्यामुळे शिक्षकांमध्ये खळबळ उडाली आहे. तर दुसरीकडे बंब यांच्या आरोप आणि मागणी विरोधात शिक्षक संघटना एकवटल्या असून उद्या औरंगाबादेत मोर्चा काढण्याच्या तयारीत आहेत.

## संपूर्ण राज्यात हे धोरण राबवावे

आ. प्रशांत बंब (आ. गंगापूर/खुलताबाद ) राज्यभरातील शिक्षक आणि शिक्षक संघटना शिक्षक ,पदवीधर आमदार या मोर्चाचे नेतृत्व करणार आहेत असे समजतर शिक्षकांचा हा मुजोरपणा आहे, शिक्षकांना मोर्चा काढणे शोभत नाही, त्यांनी एकदा विचार करावा, आपल्या लोकप्रतिनिधींशी चर्चा करून निर्णय घ्यावा, असे आवाहन देखील बंब यांनी केली आहे. दरम्यान मुख्यालयी न राहणाऱ्या शिक्षकांचे पगार रोखा या मागणीवर आपण ठाम असून यासाठी मुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्र्यांची देखील आपण भेट घेणार असल्याचे स्पष्ट केले. माझ्या मतदारसंघापासून याची अंमलबजावणी करा आणि संपुर्ण राज्यात हे धोरण राबवावे यासाठीच माझा राज्यव्यापी लढा चालू असल्याचेही बंब यांनी सांगितले.

# बी.रघुनाथ स्मृती साहित्य पुरस्कार जाहीर



प्रा.छबुराव भांडवलकर



डॉ.धोंडोपंत मानवतकर



प्रा.डॉ.सदाशिव कमळकर



प्रा.डॉ.अशोक पाठक

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** येथील श्री पतंजली आयुर्वेद क्लिनिकच्या वतीने यावर्षीपासून कवी बी.रघुनाथ स्मृती साहित्य पुरस्कार देण्यात येणार आहेत. मराठवाड्याचे भूमिपुत्र असलेले कवी बी. रघुनाथ यांचे मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात फार मोठे योगदान आहे. जालना जिल्ह्यातील सातोना ही जन्मभूमी असलेल्या बी.रघुनाथ या महान साहित्यिकाचा स्मृतीदिन दरवर्षी राज्यातील साहित्यिकांना त्यांच्या नावे पुरस्कार देऊन साजरा करण्यात येणार आहे. यावर्षी कथा, कादंबरी, कविता, वैचारिक लेखन, ललित लेखन आदी साहित्य प्रकाराचे लेखन करणाऱ्या मंठा-परतूर तालुक्यातील लेखकांना बी. रघुनाथ स्मृती साहित्य पुरस्कार देण्यात येणार असून यामध्ये परतूरचे लेखक छबुराव भांडवलकर (कादंबरी, कथा), प्रा.डॉ.अशोक पाठक (कविता), प्रा.डॉ.सदाशिव कमळकर (वैचारिक लेखन), व डॉ.धोंडोपंत मानवतकर (ललितलेखन) या साहित्यिकांना हे पुरस्कार घोषित करण्यात आले आहेत. पुरस्काराचे स्वरूप स्मृती चिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ असे असून हे पुरस्कार लवकरच एका समारंभात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिकांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील.

# प्रा. खान हसनैन आकिब यांना फिराख गोरखपुरी सम्मान

आधुनिक केसरी न्यूज



**पुसद :** येथील नामवंत कवी, शोधकर्ता, समालोचक अणि साहित्यिक प्रा. ख़ान हसनैन आक़िब यांनी आपल्या सृजनात्मक लेखनाने पुसदचे नाव जागतिक पातळीवर नेले आहे.

त्यांच्या लेखनातून झळकलेले मानवतेचे मुल्य दूर पर्यंत पोहोचलेले आहेत.

२८ऑगस्ट हा नामवंत ऊर्दू कवि रघुपति सहाय फ़िराक़ गोरखपुरी यांचा जन्मदिन होता व याच दिवशी उत्तर प्रदेश येथील प्रयाग राज (जुना इलाहाबाद) येथे प्रा. खान हसनैन आक़िब यांना 'फ़िराक़ गोरखपुरी सम्मान' प्रदान करण्यात आला आहे.



# सांस्कृतिक जडणघडण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**संस्कृती म्हणजे काय? संस्कृती निर्मितीमागचे कारणे कोणती? संस्कृती मध्ये कोणकोणत्या घटकांचा समावेश होतो? सांस्कृतीत आदान-प्रदानतेची खरेच गरज असते का? सांस्कृतिक संपन्नता व आर्थिक- राजकीय पुढारलेपण यातील साम्य-भेद कोणते? सद्यस्थितीतील सांस्कृतिक वातावरणावरून भविष्यात्मक काही आडाखे बांधता येऊ शकतात का? संस्कृती आणि धर्म एक की भिन्न? असे अनेक प्रश्न संस्कृतीच्या अनुषंगाने आपणास पडणे साहजिक आहे. या दृष्टीने काही एक चिंतन प्रस्तुत ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करू या.**

फार प्राचीन काळी माणसास फक्त दोनच कार्ये होती. उदरभरण आणि स्वसंरक्षण. वल्कले परिधान करून प्राण्यांची शिकार करणे आणि ऊन, वारा, पाऊस यापासून स्वतःचा बचाव करणे. प्रागैतिहासिक काळामध्ये अग्नी अथवा धातू याचा शोध लागलेला नसल्यामुळे फक्त पोटाची आणि हिंस्त्र पशूंची चिंता या दोनच चिंता त्याच्या ठायी होत्या. उदरभरण झाल्यानंतरच्या निवांतपणातून गरजेपोटी मग त्याने यथावकाश वेगवेगळ्या गोष्टीचा शोध लावला. अग्नीचा शोध हा फार अलीकडचा. तो म्हणजे चार लाख वर्षांपूर्वीचा. हा शोध आदी मानवाला चीनमध्ये लागल्याचा दाखला मिळतो. मांसाहार भक्षणाचे मूळ जसे आमच्या आदिम अवस्थेत सापडते तसेच आधुनिक काळातील अनेक संस्कृतींचे अग्निपूजक तत्त्वही आपल्या सांस्कृतिक संचितात दडलेले आहे. शेवटी संस्कृती म्हणजे काय? तर समाजात आणि व्यक्ती मनाच्या अवस्थेत दडलेले गुण म्हणजे संस्कृती. ही संस्कृती नेहमी मानसिक पातळीवर काम करते. मनोमय असणे हेच तिचे इंगित होय, तर या मनोमय विचाराचे दृश्यरूप म्हणजे सभ्यता. म्हणजेच सभ्यता ही भौतिकतेशी निगडीत असते तर संस्कृती मानसिक पातळीवर कार्य करते. विविध प्रकारच्या उन्नत कला प्रगत सांस्कृतिकतेच्या निदर्शक असतात. मानवाच्या इतिहासात अशा प्रकारच्या अनेक संस्कृती उदयास आल्या आणि इतर संस्कृतींना प्रेरणा देऊन त्यात विलीन झाल्या अथवा संपल्या. आजची आपली कथित सांस्कृतिक संपन्नता ही केवळ आपली निर्मिती होती, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. कारण संस्कृती ही केवळ फावला वेळ आहे म्हणून निर्माण झाली नाही तर गरजेतून निर्माण झाली. गुरे-वासरे, मेंढीपालन यातून निर्वाहाची तजवीज कशीबशी माणसाने पूर्ण केली. पुढे शेतीचाही त्यास शोध लागला आणि आजपर्यंत भटकंती करणारा माणूस एका जागी स्थिरावला. प्रवासातील शुल्लक आणि क्षणिक तंटेबखेडे वेगळे आणि स्थिर समाजातील कलह निराळे. संस्कृतीचा उदय मुळातच माणसाच्या स्थिरावण्यातून झाला आहे. प्रकृतीमध्ये विकार उत्पन्न होऊन विकृती वाढल्यामुळे संस्कृतीचा उदय झाला असे म्हणणे बाळबोध स्वरूपाचे होईल. प्रकृती म्हणजे निसर्ग किंवा फार तर नैसर्गिकपणा या नैसर्गिक अवस्थेत काही विकृती निर्माण झाली होती का? नाही. मानवी समूहाच्या गरजेतून संस्कृती निर्माण झाली. शेवटी माणसांनी जगण्यासाठी निर्माण केलेली डावपेचात्मक आखणी म्हणजे संस्कृती, असेही आपण म्हणू शकतो. इथे आणखी एक लक्षात घेण्यासारखा भाग म्हणजे या स्पर्धेत फक्त आज अस्तित्वात असलेल्या समाजाचेच पूर्वज होते असे नव्हे. आमच्यावर डार्विनच्या सिद्धांताने असे काही गारूड केले आहे की, त्यातून अजूनही पूर्णपणे आपण बाहेर येऊ शकलो नाही. आपल्या होमो-सेपियन प्रजाती सोबतच इतर तेवीस प्रजाती या स्पर्धेत होत्या. साधारणतः दोन लाख वर्षांपूर्वी या प्रजाती नष्ट झाल्याचे दाखले मानववंशशास्त्र देते. अनेक प्राच्यविद्या पंडितांचे त्यावर मतैक्य आहे. ज्याप्रमाणे कोणत्याच संस्कृतीमध्ये मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात नव्हती पण त्याचे शोधू शोधू पुरावे देण्याचा आपण प्रयत्न करतो असे इरावती कर्वे म्हणतात, तद्वतच डार्विनच्या उत्पत्ती आणि विकास सिद्धांतास आजच्या विज्ञानातही काही आधार सापडत नाही. तसे असते तर होमो-सेपियन सोबत स्पर्धेत असणाऱ्या इतर तेवीस प्रजाती नामशेष होण्याचे उत्तर डार्विनच्या सिद्धांतातून मिळाले असते. असो.

आजपर्यंतच्या इतिहासात जेवढा शोध सभ्यतांचा लागलेला आहे तेवढा संस्कृतीचा मात्र झालेला नाही. कारण वर म्हटल्याप्रमाणे सभ्यता भौतिक स्वरूपाची असते आणि भौतिक वस्तू फार फार तर पाच सहा हजार वर्षापासूनच्या दाखविता येतील. हिस्ट्री ऑफ सिव्हिलायझेशन हा जागतिक पातळीवरील सभ्यतांचा बृहत आराखडा असणारा विल डुरांट यांचा ग्रंथही ज्ञात इतिहासापासूनच सुरु होतो. कारण साधनांचा अस्सलपणा तत्कालीन परिस्थितीत शोधूनही सापडत नाही. सभ्यतेच्या खुणांवरून आपण फार तर त्यांच्या सांस्कृतिक परिस्थितीची कल्पना करू शकतो. वास्तू, शिल्प, चित्र, आभूषणे अशाच तत्सम





गोष्टी आपण शोधू शकतो; परंतु तत्कालीन धारणा, विधीसंकेत, परस्परसंबंध, सांस्कृतिक स्तरीकरण, शिष्टाचार, नातेसंबंध, व्यक्ती आणि समाज, तसेच समूह आणि समूहाचे संबंध हे फक्त आपणास ज्ञात वस्तूवरून कल्पना करण्यास मदत करू शकतात; परंतु स्पष्टपणे तत्कालीन सांस्कृतिक चित्र आपण रेखाटू शकत नाही. ही संस्कृतीच्या अभ्यासातली फार मोठी अडचण आहे. असे असले तरी जगात ज्या संस्कृती प्राचीन म्हणून गणल्या गेल्या त्यांची प्राथमिक तोंडओळख तरी व्हावी जेणेकरून आपल्या आकलनात भर पडेल, हा या लेखाचा एकमेव उद्देश होय.

मानवी जीवन स्थिरस्थावर झाल्यानंतर संस्कृतीचा विकास होण्यास प्रारंभ झाला. जगात प्राचीन काळी ज्या काही मोजक्या संस्कृती अस्तित्वात होत्या, त्यातील काही संस्कृतीमध्ये सांस्कृतिक आदान-प्रदान होत असल्याचे दिसून येते. यातूनच पुढे चालून काही नवीन संस्कृतीने जुन्या संस्कृतीची जागा घेतल्याचे लक्षात येते. ही परस्परांतील देवघेव व्यापार विषयक होती, तशीच अभौतिक बाबतीतीलही होती. प्रादेशिक सानिध्य हा घटक त्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावल्याचे दिसून येते. विशेषतः मेसापोटेमिया संस्कृतीच्या बद्दल आपणास असे म्हणता येईल. या गटात ज्या काही चार-पाच संस्कृती येतात, त्यांनी निश्चितच परस्परांवर प्रभाव पाडलेला आहे. एकेका संस्कृतीचा अभ्यास करताना या गोष्टी आपल्या निदर्शनास येतील.

संस्कृती आणि धर्म या अनुषंगाने विचार करता तसा अर्थार्थी या दोघांचा काही संबंध नाही; परंतु धर्माने जबरदस्तीने सांस्कृतिक क्षेत्रात हस्तक्षेप करून संस्कृतीचे स्वतंत्र अस्तित्व संपुष्टात आणले. धर्म म्हणजे अत्यंत सुसंघटितपणे व नियोजनबद्धरीत्या चालविलेली सामाजिक चळवळ असते, ती समाजाला एक चौकट प्रदान करते. व्यावहारिक डावपेच संस्कृतीमध्येही होते; पण धर्माने ते विशिष्ट चौकटीत असे बंदिस्त केल्यामुळे त्या बाहेरचे सांस्कृतिक भान घेण्यापासून त्यांना मज्जाव करण्यात आला. त्यामुळे फार तर धर्म म्हणजे बंदिस्त सांस्कृतिकता, असे आपण म्हणू शकतो. जागतिक प्रमुख संस्कृती, धर्म, संप्रदाय, अन्य विचारधारा या सर्वांच्या असण्यातही माणूस आज एकाकी आहे, हा खरेच चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# अतिरेक्यांचे उदात्तीकरण,कबरीचे सुशोभीकरण



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**एखाद्या अतिरिकेची कबर हे त्याचे स्मृती स्थळ बनता कामा नये. असे झाल्यास हजारो तरुण त्याच स्मृतिस्थळाकडे पाहून पुन्हा दहशतवादाची प्रेरणा घेतील व मुंबई बॉम्बस्फोटासारखे कृत्य घडविण्यासाठी सज्ज राहतील. मागील काही काळात आय एस आय एस ने जगामध्ये धुमाकूळ घातलेला होता. जगभरातील तरुणांना त्यांनी आपल्या सैन्यांमध्ये सामील होण्याचे आवाहन केलेले होते. त्यावेळेस भारतातील काही तरुण त्यात सामील व्हायला गेले होते. यावरून आंतरराष्ट्रीय आतंकवादाचा सुद्धा भारतातील विशिष्ट समाजावर परिणाम पडत असतो. व त्यालाही तो मार्ग योग्य आहे असे वाटत असते. काश्मीरमध्ये सुद्धा सुरक्षा दलांच्या गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या अतिरेक्यांच्या जनाज्या मध्ये मोठ्या प्रमाणावर लोक सामील होत असतात.**

मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणात फाशी झालेला अतिरेकी याकूब मेमन याच्या कबरीचा वाद उफाळून आलेला आहे. त्याच्या कबरीला मार्बल लावण्यात आले व एलइडी लाईट सुद्धा लावण्यात आले या मानसिकतेला काय म्हणावे? दुर्दैवच म्हटले पाहिजे. हा प्रकार ठाकरे सरकारच्या काळात झालेला आहे असे म्हटले जाते. वास्तविक पाहता एखाद्या अतिरिकेची कबर सर्वसामान्य लोकांच्या सोबत ठेवणे हा सर्वसामान्य जनतेचा सुद्धा अपमानच आहे. कदाचित एखाद्या देशभक्ताच्या बाजूला अतिरेक्याला झोपवले जाईल आणि हा त्या देशभक्ताचा अपमान होईल.

अतिरेकी कुठल्याही जातीचा किंवा धर्माचा असो तो त्या धर्माच्या नीतिमूल्यांप्रमाणे तर वागलेलाच नसतो मग त्या धर्माप्रमाणे त्याला मूठ माती तरी का द्यावी? अमेरिकेने सद्दाम हुसेनला फाशी दिल्यावर त्याचा मृतदेह समुद्रात फेकून दिला. उद्देश हा होता की त्याची कुठेही कबर बनू नये व त्या कबरीवर कोणीही फुले वाहू नयेत. त्याची कबर त्याचे स्मृतीस्थळ होऊ नये यासाठीच अमेरिकेने हे केलेले होते. भारतही तसे करू शकला असता. परंतु सर्वसामान्य न्याय म्हणून त्या अतिरेक्याचा मृतदेह त्याच्या घरच्यांना सोपविण्यात आला. याकूब मेमनच्या जनाज्यामध्ये सुद्धा हजारो लोक सामील झालेले होते. यावरून अतिरेकाचे त्या समाजातील स्थान आपल्या लक्षात येते. इतिहासाचे विस्मरण होऊ देणे हा आपल्या समाजाचा दुर्गुण आहे. समाज आपल्या इतिहासाला विसरून जातो त्यामुळे कोण अतिरेकी होता व कोण देशभक्त होता याचा फरक लोकांना त्याच्या कबर वरून किंवा थडग्यावरून होत नाही. काही वर्षांनी या थडग्याची मजार बनविली जाते व एखादा अतिरेकी सुद्धा एखाद्या संताप्रमाणे पूजनीय होऊन जातो. लोकं त्याच्या मजारीवर आम्हाला धंद्यामध्ये बरकत येऊ दे यासाठी किंवा मूलबाळ होऊ दे यासाठी प्रार्थना करायला जातात हे केवढे मोठे दुर्भाग्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा कोथळा काढला व त्याला प्रतापगडावर ठार मारला. आपल्या सभ्यतेप्रमाणे त्या प्रतापगडावर त्याचे दफन करण्यात आले. परंतु काळ बदलला व अफजल खान हा कोणी आतंकवादी होता. तो स्वराज्यावर चालून आलेला होता. तो शिवाजी महाराजांचे प्राण घ्यायला आला होता. ही गोष्ट सोयीस्करपणे बाजूला सारून तिथे त्याची भव्य मजार उभी राहते. तिथे जाणारा हिंदू समाज अफजलखानाला मूल बाळ होऊ दे यासाठी नवस बोलतो. तेथे चढवलेल्या चादरीवर पैसे टाकतो. याला काय म्हणावे? देव भोळेपणा की मूर्खता! विशेषतः काँग्रेसच्या काळामध्ये असे थडग्यांचे उदात्तीकरण मजारांमध्ये खूप झालेले आहे. संपूर्ण देशभर जर आपण बघितले तर आपल्याला अशा हजारो मजारी दिसतील की ज्या कोणत्याही संताच्या नाही किंवा फकीराच्या नाही. ठिकठिकाणी एवढे संत आणि फकीर झालेच कुठे? जे झाले ते धर्मांध व अतिरेकीच होते. त्यांचा या समाजाशी व समाजाच्या कल्याणाशी काहीही संबंध नव्हता. परंतु तरीही त्यांचे थडगे उभे राहते पुढे त्याची मजार होते, त्याचा दर्गा होतो व भारतामध्ये असे हजारो दर्गे आज उभे आहेत. सर्वसामान्य हिंदू समाज देवभोळेपणे या मजारींवर जात असतो आणि दर्ग्यांवर पण जात असतो हेही दुर्भाग्यच आहे. हिंदूंची मानसिकता प्रत्येक कणाकणामध्ये देव पाहण्याची आहे त्यामुळे



कदाचित तो दर्ग्यामध्ये सुद्धा देव पाहू शकत असेल. परंतु वास्तविकता मात्र हीच आहे की धर्मांध कट्टरवादी जिहादी यांचे भारतामध्ये अनेक मजारी व दर्गे उभे आहेत. हे अतिरेक्याचे उदात्तीकरण आहे. एखाद्या मजारेवर सुशोभीकरण करण्यात आले असते तर हिंदू समाजाला त्याचे काहीही वावगे वाटले नसते. परंतु याकूब मेमन सारख्या मुंबई बॉम्ब स्फोटातील अतिरेक्याच्या कबरेचे सुशोभीकरण करण्यात येते व त्याची माहिती गुप्तचर विभागाला लागू नये. त्याने ती माहिती सरकारला देऊ नये. यावरून गुप्तचर विभागाचे अपयश तरी लक्षात येते किंवा सरकारचा नाकर्तेपणा तरी लक्षात येतो. एखाद्या अतिरिकेची कबर हे त्याचे स्मृती स्थळ बनता कामा नये. असे झाल्यास हजारो तरुण त्याच स्मृतिस्थळाकडे पाहून पुन्हा दहशतवादाची प्रेरणा घेतील व मुंबई बॉम्बस्फोटासारखे कृत्य घडविण्यासाठी सज्ज राहतील.

मागील काही काळात आय एस आय एस ने जगामध्ये धुमाकूळ घातलेला होता. जगभरातील तरुणांना त्यांनी आपल्या सैन्यांमध्ये सामील होण्याचे आवाहन केलेले होते. त्यावेळेस भारतातील काही तरुण त्यात सामील व्हायला गेले होते. यावरून आंतरराष्ट्रीय आतंकवादाचा सुद्धा भारतातील विशिष्ट समाजावर परिणाम पडत असतो. व त्यालाही तो मार्ग योग्य आहे असे वाटत असते. काश्मीरमध्ये सुद्धा सुरक्षा दलांच्या गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या अतिरेक्यांच्या जनाज्या मध्ये मोठ्या प्रमाणावर लोक सामील होत असतात. बुऱ्हान वाणीसारखा अतिरेकी हा काश्मीरमध्ये हिरो बनतो, पोस्टर बॉय बनतो ही सुद्धा येथील जनते करता व देशाकरीता चिंतेचीच बाब होय. दहशतवादाचे बीज विशिष्ट धर्माच्या समाजात खोलवर रुजलेले आहे. त्यांची माथी भडकविण्याचे काम सातत्याने सुरू असते. अतिरेक्यांना मदरशामध्ये आश्रय देण्याच्या घटना सुद्धा घडत असतात. मदरशामध्ये शिकणाऱ्या लहान मुलांवर या सर्व गोष्टींचा काय परिणाम पडत असेल?ज्यांनी बालपणी दहशतवाद्यांपासून प्रेरणा घेतलेली आहे असे लोक पुढे दहशतवादी बनले नाही तर त्यात नवल ते काय? अतिरेक्यांच्या कबरीचे जर स्मृतीस्थळ व्हायला लागले तर जो समाज त्यांचे उदात्तीकरण करत आहे त्याच्या राष्ट्रनिष्ठेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्याखेरीज राहणार नाही. वास्तविक अतिरेकी जरी एखाद्या विशिष्ट धर्माचा असेल तरीही तो अतिरेकी होता, देशद्रोही होता आमच्या समाजाची शांतता बिघडविण्याचे कार्य त्यानी केलेले होते आणि म्हणून त्याच्यावर सामाजिक बहिष्कारच टाकल्या गेला पाहिजे. त्याच्या घरच्यांनी सुद्धा त्याच्या प्रेताची मागणी करू नये. अशी मागणी केली जाते कारण समाजामध्ये अतिरेक्यांना स्थान आहे असाच त्याचा अर्थ होतो. समाजाला जर असे वाटत असेल की सुरक्षा दलांशी लढताना मारला गेलेला अतिरेकी हा शहीद आहे म्हणजे धर्माकर्ता मरण पत्करलेला आहे तर त्याला सन्मान प्राप्त होईल. एकंदरीत ही मानसिकताच अत्यंत चुकीची आहे व देशाच्या शांततेला घातक आहे. म्हणूनच ही बदलविणे सुद्धा अतिशय आवश्यक आहे. समाज कोणताही असो त्यांनी आपल्या समाजामध्ये अतिरेकी तयार होणार नाही, देशद्रोही तयार होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. अतिरेक्यांचे व अतिरेकाचे उदात्तीकरण थांबविले पाहिजे असे वाटते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# भाजप v/s उद्धव सेना



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**अमित शाह यांना खोटे ठरवण्याचा प्रमाद, स्वतःला महाराष्ट्राचा वाघ समजणाऱ्याने केला. बरे केला तर केला त्याचे भांडवल करून जनतेला आणि भाजपला दगा देऊन असंगाशी संग केला. मविआ सरकार स्थापन करून सत्तेसाठी लाचारीचा परमोच्च मानबिंदू स्थापन केला. स्वपक्षाचे वाटोळे करून घेतले. अमित शाह यांनी बंद खोलीत मला अडीच वर्षाच्या मुख्यमंत्री पदाचा शब्द दिला होता. हे वारंवार सांगून मीच खरे बोलतो आहे, अमित शाह नाकारत असताना ही, ते खोटे बोलत आहेत असे वारंवार सांगून एका राष्ट्रीय पक्षाच्या दोन नंबरच्या नेत्याला आपण आवकात विसरून आणि राज्यस्तरीय पक्षप्रमुख असून चिडवत आहोत, डिवचत आहोत, खोटे पाडत आहोत हे विसरून पंगा घेतला. शक्तीतील फरक लक्षात न घेता पंगा घेतल्याचे परिणाम शिवसेना भोगत आहे.**

भारताचे कणखर गृहमंत्री, भारतीय जनता पक्षाचे चाणक्य, आजच्या भारतीय राजकारणातील सर्वात यशस्वी रणनितीकार, अनेक विरोधीपक्ष सरकारांचे पतन करण्याचे षडयंत्र रचून, सत्ता, धन, शक्ती आणि युक्ती वापरत सर्वत्र भाजप, हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन कार्यरत असणारे माजी पक्षाध्यक्ष श्री अमितभाई शाह परवा लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी मुंबईत येऊन गेले. नरेंद्र मोदी आणि अमित शाह हे दोन गुजराथी , कट्टर संघ स्वयंसेवक आज भारतीय राजकारणात सर्वोच्च शक्तीमान नेते आहेत. ते जसे शक्तीमान आहेत तसेच ते अतिशय आग्रही, हेकट, आणि पराकोटीचे हट्टी आहेत. तसेच सार्वजनिक जीवनातील अपमान, उपमर्द, वैयक्तिक टीकाटिप्पणी न विसरणारे आहेत. गुजराथमधील गोध्रा कांडानंतरच्या दंगली, नेहमी आक्रमक भूमिका घेत हिंदू धर्मियांना प्रचंड हानी पोहोचवायची चटक लागलेल्या समाजाला, काँग्रेस सरकार कायम मदत करत असे, ते या दंगलीचे वेळी जमले नाही. विपरीत परिणाम भोगावे लागले. परिणामी काँग्रेस पक्ष आणि पक्ष धुरीण त्या दंगलीचे वेळी फारच तोंडावर आपटले आणि मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी आता हिंदू मार खाणार नाहीत हे दाखवून दिले. चिडलेल्या सोनिया गांधी नरेंद्र मोदींना मौत का सौदागर म्हणाल्या. त्यापूर्वी गुजराथचे गृहमंत्री असलेले अमित शाह यांचेवर खुण, भ्रष्टाचार याचे आरोप करून त्रास दिला होता. अमित शाह यांना गृहमंत्रीपद सोडावे लागले होते.

हे दोन्ही प्रसंग हे दोघे विसरलेले नाहीत. आता सोनिया गांधी यांच्या दुर्दैवाने मोदी आणि शाह सर्वोच्च पदावर सध्या विराजमान असून, सर्वशक्तिमान झालेले आहेत. एरवीच पक्षातील विरोधकांना या दोघांनी एकतर वठणीवर आणले, बाजूला फेकले किंवा सडवले. पक्षातील क्रियाशिलतेतून दूर ढकलले. सुब्रमण्यम स्वामी त्यातीलच एक. पण या स्वामींनी एक कोलीत आयते यांचे होतात देऊन ठेवले होते. नॅशनल हेराल्ड प्रकरणी केसेस् दाखल करून ठेवल्या होत्या. तसेच मनमोहनसिंग यांच्या दहा वर्षाच्या पंतप्रधान पदाच्या सत्ता काळात सर्व सूत्रे सोनिया गांधी यांच्या हाती एकवटली होती. त्या जोरावर आणि काँग्रेस संस्कृतीचे बाटके खाओ धोरणा नुसार प्रियांका पती वाड्राने भरमसाठ जमीन लूट प्रकरणे करून ठेवली आहेत. त्यांना राजस्थान, हरियाणा, हिमाचल प्रदेश, आदी त्याकाळी काँग्रेस शासित असलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी मोकळे रान करून दिले होते. या दोन्ही प्रकरणात गांधी घराणे अडचणीत येणार आहे.

मध्यंतरी राहूल गांधी यांनी सोनिया गांधी यांच्या सह चीन सोबत एक गुप्त सहकार्य करार केला अशी वदंता कानावर आली होती. खरे खोटे माहीत नाही. कोणतीही संवैधानिक पदे नसताना हवे ते बंगले, हे तिघेही स्वतंत्र वापरत आहेत. सोनियाजी एकट्याच आहेत. राहूल गांधी, अजून तरी भारतीय माहितीनुसार अविवाहित म्हणजे सडे आहेत. मग या दोघांना दोन वेगवेगळे मोठमोठे बंगले आणि कार्यालये कशासाठी अलॉट झाली आहेत? प्रियांकाला, आत्ता आत्ता बंगला रिकामा करायला भाग पाडले आहे.

तर नरेंद्र मोदी आणि अमित शाह या दोघांना गांधी कुटुंबाने डिवचले आहे, दुखावले आहे.

बरे मनेका गांधी आणि वरूण गांधी, हे दोघेही सोनिया गांधी यांना विरोध म्हणून भाजप सोबत आहेत. पण या टर्ममध्ये मनेकाजींचे मंत्रीपद काढून घेतले. वरूण गांधी नेमके काय भूमिका घेऊन राजकारणात आहेत ते कळतच नाही, त्यांना स्वतःलाही. अशा परिस्थितीत नेहरू, गांधी घराणे अधू, विकलांग आणि अपाहीज झालेले आहे. नरेंद्र मोदी आणि अमित शाह हळूहळू फास आवळत आणत आहेत. देशाचे राजकीय क्षेत्र स्वच्छ करण्याचा विडा या दोघांनी उचललेला आहे. कायद्याचे राज्य आणि भारतीय राज्यघटनेला धरून सरकार चालेल ही दोन उद्दीष्टे समोर ठेऊन केंद्र सरकारचे काम चालू आहे.

अमित शाह यांना खोटे ठरवण्याचा प्रमाद, स्वतःला महाराष्ट्राचा वाघ समजणाऱ्याने केला. बरे केला तर केला त्याचे भांडवल करून जनतेला आणि भाजपला दगा देऊन असंगाशी संग केला. मविआ सरकार स्थापन करून सत्तेसाठी लाचारीचा परमोच्च मानबिंदू स्थापन केला. स्वपक्षाचे वाटोळे करून घेतले. अमित शाह यांनी बंद खोलीत मला अडीच वर्षाच्या मुख्यमंत्री पदाचा शब्द दिला होता. हे वारंवार सांगून मीच खरे बोलतो आहे, अमित शाह नाकारत असताना ही, ते खोटे बोलत आहेत असे वारंवार सांगून एका राष्ट्रीय पक्षाच्या दोन नंबरच्या नेत्याला आपण आवकात विसरून आणि राज्यस्तरीय पक्षप्रमुख असून चिडवत आहोत, डिवचत आहोत, खोटे पाडत आहोत हे विसरून



पंगा घेतला. शक्तीतील फरक लक्षात न घेता पंगा घेतल्याचे परिणाम शिवसेना भोगत आहे.

मुंबईत येऊन, म्हणजे तुम्ही ज्या महानगराला स्वतः ची विरासत समजता, अनभिषिक्त सम्राट समजता, जीथे तुमची सत्ता आहे, तीथे येऊन तुम्हाला जमीन दाखवा ,असे ठणकावून सांगून दिमाखात निघून गेले. एकनाथ शिंदे यांना जेवढ्या वेळा आणि जेवढा वेळ भेटी दिल्या तेवढा वेळ ते कोणलाच देत नाहीत यातच तुमचे बद्दलचा राग जाहीर होतो. आपल्याला केंद्र सरकार म्हणून काय काम करायचे आहे याची सुस्पष्ट जाणीव केंद्र सरकारला आहे. जी महाराष्ट्रात फक्त आपली भूमिका काय, हे माहीत नसलेले उध्दव ठाकरे तोंडावर पडले आहेत.

उध्दव ठाकरेंना वाटले स्वतः नरेंद्र मोदी म्हणालेत की मी शरद पवार साहेबांचे बोट धरून राजकारण शिकलो. म्हणजे साहेब, नरेंद्र मोदीपेक्षा सक्षम आणि पॉवरफुल आहेत. म्हणून त्यांनी स्वपक्षाशी, एकनाथ शिंदे यांच्याशी आणि आपल्याच पक्षाच्या निवडून आलेल्या आमदार, खासदारांशी गद्दारी करून स्वतःच मुख्यमंत्री झाले. गद्दारी, दगाबाजी पक्षप्रमुखानी केली आहे. एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पन्नास साथीदार आमदारांनी नव्हे. हे धाडस केवळ साहेबांचे भरवशावर आणि सोनिया गांधी यांच्या ईशाऱ्यावर केले, ते संजय राऊत या स्वप्नाळू सल्लागाराचे आधिन जाऊन.

आज काय परिस्थिती आहे. पोपट पिंजऱ्यात जाऊन बसलाय. साहेबांनी हात सोडलाय, सोनिया गांधी आपल्याच मुलाच्या भविष्याच्या चिंतेत आहेत. आणि उध्दवजींच पोरगं रस्त्यावर आलंय. अमित शाह यांनी मुंबईत येऊन आशिष शेलार आणि कंपनीला जे कान मंत्र दिलेत त्याची फक्त अंमलबजावणी मुंबई भाजपला करायची आहे. आता मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूका होईपर्यंत अमित शाह वारंवार सासरवाडीत येत राहणार. (महाराष्ट्रातील कोल्हापूर शहर, आपल्या चंद्रकांतदादा पाटलांच गाव हो.)

देवेंद्र फडणवीस यांचेशी गुजगोष्टी करत आशिष शेलार यांना मार्गदर्शन करत राहणार आणि मुंबई मध्ये एकट्या भाजपचे 135 ते 145 नगरसेवक निवडून आणणार आहेत. एकनाथरावांचे निवडूण येणारे चाळीस पंचेचाळीस सोडून. ते वेगळेच निवडून येणार आहेत. म्हणजे युतीचेच तब्बल जवळपास 190 चे वर नगरसेवक निवडून येतील. या निवडणूकीत मुंबई सह ठाणे, कल्याण डोंबिवली, नवी मुंबई या सगळ्या महापालिका, ज्या शिवसेनेच्या जीवनवाहीन्या आहेत, रक्तवाहिन्या आहेत, त्या उध्दवजींचे हातातून जाणार, निसटणार. येत्या 27 तारखेला एकतर शिवसेनेचे निवडणूक चिन्ह गोठवले जाईल किंवा एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला मिळेल. कांहीही झाले तरी धनुष्यबाण आता उध्दवजींचे गटाकडे राहणार नाही. आदित्य ठाकरेंनी रोजगार मिळवावा. शिवसेना पक्ष म्हणून टीकला तरी मुंबई, ठाणे, कल्याण, नवी मुंबई, औरंगाबाद, उल्हासनगर, पनवेल, भिवंडी येथील सत्ता जाणारच आहे.

नरेंद्र मोदी, अमित शाह, राजनाथसिंह, जे. पी. नड्डा, देवेंद्र फडणवीस, आशिष शेलार, बावनकुळे, आता उध्दव ठाकरेंना सळो की पळो करून सोडतील.

भास्कर जाधव या दलबदलूने सुरेश कलमाडी यांनी पवार साहेबांचे वेळी केंद्रात केले होते तसे आधीच वादग्रस्त विधान करून त्यात तेल ओतून ठेवले आहे. म्हणे भाजपचा दंगली घडवण्याचा प्लॅन आहे. गोंधळ हरण्याची शक्यता असणारे करतात. विजयाची खात्री असणारे नाही करत.

मी परत सांगतो, कोर्टाचा निर्णय ठाकरेंविरोधात गेला आणि या सर्व महानगरपालिका उध्दवजींचे हातून निसटल्या तर हे भास्कर जाधव ही निसटणार, साहेबांचे आश्रयात विसावतील. तर अमित शाह यांनी मुंबईत येवून लालबागच्या राजाची सहकुटुंब आरती केली, दर्शन घेतले, प्रसाद स्विकारला. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, आशिष शेलार यांचे घरीही दर्शन घेतले, पण राजसाहेब ठाकरेंकडेही फिरकले नाहीत.

राज साहेबांशी जागा वाटपात भागिदारी करायची की नाही हे स्थानिक लेवलला ठरेल, तो राष्ट्रीय पातळीवरचा प्रश्न नाही. तसेही तो विषय जे पी नड्डा यांचे अखत्यारीतला आहे, आपला त्याचेशी संबंध नाही. भाजप कार्यकक्षा आणि पक्ष शिस्त पाळणारा पक्ष आहे हे सुचवून निघून गेले.

एकंदर काय तर कोणतेही राजकीय पक्ष असोत , ज्या ज्या पक्षांनी मोदी शाह यांना दुखावले आहे, घराणेशाहीची राजवट राबवताना भ्रष्टाचार केला आहे, ज्यांनी देशाला आणि देशाच्या प्रामाणिक नागरीकांना लुबाडले आहे, आशा पक्षांना ते सोडणार नाहीत. अरविंद केजरीवाल, नितीशकुमार, बघेल, गहलोत लाईन मध्ये उभे आहेत. 2024 ची सार्वत्रिक निवडणुक ही देशात क्रांतिकारक बदल घडवणारी ठरणार आहे. गुलाम नबी आझाद, ही मुख्य प्रवाहात काश्मीर ला आणण्यासाठी सहाय्यभूत भुमिका बजावणार आहेत.

2026 पर्यंत भारतात आश्चर्यकारक बदल घडणार आहेत. भारत महासत्ता म्हणून कंट्रोलींग पावर ठरणार आहे.

# खरंच माणसं कित्ती बदललीत



राजश्री कुलकर्णी
संपर्क क्र. 9827142714

आधुनिक केसरी

**पुर्वी हजारों वर्षे एकत्र कुटुंब पद्धती होती, हळुहळु ती विभक्त झाली व प्रत्येकजण वेगळे होऊ लागले, नंतर भावाभावाचे पटेना मग ते वेगळे झाले आता वडिलांचे मुलांशी पटेना तेही वेगळे राहु लागले इथपर्यंत ठीक आता मुलाचे लग्न झाले की काही दिवसातच नवरा-बायकांचे पटेना आणि तेही वेगवगळे राहु लागलेत हा खेळ आणखीन पुढे कुठपर्यंत जाणार सांगता येत नाही, माणुसकी नावाचा काही प्रकार असतो हे आता गूगलवर वीकिपिडीयात बघावा लागतोय.**

आजकाल विश्वास ठेवणे एवढे कठीण होवून बसले की काय सांगावं, म्हणे बदल संसार का नियम है, पण किती त्यालाही काही मर्यादा आहेत का नाही ? चेहरे ओळखणे कठीण झालंय, कोणावर विश्वास ठेवायचा तर लागच नाही, अन म्हणे विश्वास पर दुनिया टीकी हुई है, मग आता पडणार की काय असंच झालंय.

बदल.. बदल... बदल...! अगदी नकोसा झालाय हा बदल, जीव कासावीस होतो हा बदल पाहून, बदल प्रगतीकडे नेणारा असावा अधोगतीकडे नेणारा नको, टेक्नोलॉजीचे ठीक आहे पण संस्कृती एवढी का बदलावी हे समजणे खरंच खूप कठीण आहे. देवाने अक्कल नावाची वस्तू फक्त मानवालाच दिलिय म्हणे मग चांगलं-वाईट न कळण्याइतका मानव खरंच बुद्धू तर नक्कीच नाही मग कळत असूनही असले वागणे याला काय म्हणावे. असेच चालत राहिले तर लवकरच जगाचं वाट्टोळं नक्कीच समजा, सध्याच्या युगाने आत्तापर्यंतचे सर्व रेकॉर्ड ब्रेक करताना पहावयास मिळताहेत, आजपर्यंत कधीही न पाहिलेले आई व मुलामधील संबंध, वडील आणि मुलीमधील संबंध, नवरा बायकोमधील संबंध, मित्रा-मित्रांमधील संबंध, शेजारी-शेजा-यांमधील संबंध इतके टोकाचे बदललेले आजपर्यंत कधीच पहावयास मिळाले नाही, कोठे घेवून चाललो आहोत आपण आपली संस्कृती.

बरं कळतं तर सर्वांना मग याचं वाईट कुणालाच कसं वाटत नसेल याचे आश्चर्य वाटते. तो एक लहानपणी आम्ही खेळ खेळत होतो, एकामागे एक उभे राहून सर्वात पुढे उभे रहाणा-याने एक छोटी कथा (अलक) त्याच्या बाजूच्या मुलाच्या कानात सांगायची मग तीच त्याने त्याच्या बाजूच्या मुलाला सांगायची व असेच हा खेळ शेवटच्या मुलापर्यंत चालायचा व शेवटच्या मुलानी ती गोष्ट शेवटी सर्वांसमोर मोठ्यानी सांगायची व त्या गोष्टीत झालेला अमुलाग्र बदल हा सर्वांनाच आश्चर्यचकित करायचा, अगदी तसे झाले आहे आपल्या संस्कृतीचे, आपल्या खापर पंजोबांनी एक कार्य केले पुढे पंजोबानी ते कार्य केले, नंतर आजोबानी नंतर वडिलांनी पुढे आपण आणि आता आपली मुलं जे दिवे लावतात, बघा कित्ती बदल, मुळंच बदललय, आता काय होणार पुढे-पुढे....

पुर्वी हजारों वर्षे एकत्र कुटुंब पद्धती होती, हळुहळु ती विभक्त झाली व प्रत्येकजण वेगळे होऊ लागले, नंतर भावाभावाचे पटेना मग ते वेगळे झाले आता वडिलांचे मुलांशी पटेना तेही वेगळे राहु लागले इथपर्यंत ठीक आता मुलाचे लग्न झाले की काही दिवसातच नवरा-बायकांचे पटेना आणि तेही वेगवगळे राहु लागलेत हा खेळ आणखीन पुढे कुठपर्यंत जाणार सांगता येत नाही, माणुसकी नावाचा काही प्रकार असतो हे आता गूगलवर वीकिपिडीयात बघावा लागतोय, मुलं पप्पांना विचारतायत पप्पा ती शेजारची ताई अन दादा लिव इन रिलेशनमध्ये रहातात मग त्यांचे रिलेशन काय असते ? अजूनही वेळ गेलेली नाही, अजूनही आपण यातून सावरू शकतो पण प्रत्येक कुटुंबाला आपल्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीकडे वैयक्तीक लक्ष द्यावे लागेल फक्त आपलं स्वत्व न बघता मुलांना संस्कार वर्गात पाठवून सुसंस्कृत करणे खूप गरजेचे आहे नाहीतर संस्कार या शब्दाचा अर्थ पुढच्या पिढीला गूगलवरच सर्च करावा लागेल हे नक्की.

# मिसाईल वुमन : टेसी थॉमस

आधुनिक केसरी

**दिसायला काकूबाई वाटत असल्या तरी त्या कुणी सामान्य गृहिणी किंवा निवडणुकीला उभ्या राहिलेल्या कोणी उमेदवारही नाहीत. अफाट आणि अचाट कर्तुत्व असलेल्या ह्या महिलेचे नाव आहे टेसी थॉमस, एक असे नाव जे तुम्ही कधीच ऐकले नसणार. कदाचित पुढेही कधी ऐकणार नाहीत. कारण मिडिया अशा लोकांना कधीच प्रसिद्धी देत नाही. त्यासाठी आपले क्रिकेटपटू आणि सिनेस्टार त्यांच्या दिमतीला आहेतच.**

रेखा दिक्षीत

डॉक्टर अब्दुल जे कलामना आपण " मिसाईलमन " म्हणून ओळखतो. तर आपल्या देशातील हजारो शास्त्रज्ञ टेसी थॉमसना " मिसाईल वुमन " म्हणून ओळखतात. टेसी थॉमस " भारतीय अंतराळ संशोधन संस्थे " ( इस्रो ) च्या अधिपत्याखालील डिफेन्स रिसर्च अंड डेवलपमेंट ऑर्गनायाजेशनमद्धे त्या कार्यरत आहेत आपल्या अफाट बुद्धिमत्तेच्या बळावर तब्बल दोन हजार शास्त्रज्ञांच्या प्रमुखपदी असलेल्या त्या देशातील एक महान शास्त्रज्ञ, ज्यांच्या नेतृत्वाखाली गेल्या काही वर्षात देशाने " अग्नी " क्षेपणास्त्राचा पल्ला चार हजार ते पाच हजार किलोमीटर गाठून देशाच्या शत्रूंच्या हृदयात धडकी भरवली आणि देश अधिक सुरक्षित करण्यात मोलाचा वाटा उचलला. टेसी थॉमस यांच्या त्या अफाट कर्तुत्वाला माझा त्रिवार सलाम ! केरळमधे एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या टेसीचे नाव टेसी पडले ते मदर तेरेसाना आदर्श मानणाऱ्या तिच्या आई वडिलांमुळे. लहानपणापासूनच जवळून अवकाशात झेप घेणाऱ्या क्षेपणास्त्राना, उपग्रहांना पाहून तिला त्या क्षेत्राविषयी कुतूहलमिश्रित ओढ लागून राहिली होती. अभ्यासात हुशार असल्यामुळे आयपीएस अधिकारी



व्हायचं तिचं स्वप्न होतं. पण ती वळली अंतराळ संशोधन संस्थेकडे. पुण्यामधे राहून तिने एम.टेकची पदवी घेतली. तिच्यातील अफाट बुद्धिमत्ता हेरून डॉक्टर अब्दुल जे. कलाम यांनी तीचा समावेश अग्नी क्षेपणास्त्र प्रोजेक्टमधे केला. आणि स्वतःच्या अफाट बुद्धीमत्तेच्या बळावर त्या तडक अग्नी क्षेपणास्त्र ५ च्या प्रोजेक्ट डायरेक्टर पदावर जाउन पोहोचल्या.तेव्हा त्यांनी एक इतिहासच घडवला. तेव्हापासून त्यांची ओळख " अग्निपुत्री " म्हणूनही झाली.

आज ४९ वर्षे वय असलेल्या ट्रेसी थोमस एक आदर्श गृहिणीही आहेत. करिअर आणि संसार अशी कसरत त्यानाही रोजच करावी लागते. २४ तासामधे कोणत्याही क्षणी कामावर हजार राहावे लागत असूनही आपल्या हाताने बनविलेला स्वयंपाक कुटुंबातील सदस्यांना देण्यातील आनंद त्या भरभरून घेत असतात. देश अधिक सुरक्षित करण्यासाठी अधिकाधिक लांब पल्याची क्षेपणास्त्रे विकसित करण्याच्या नवनवीन कल्पना राबविताना त्यांना आपण हे सारे जागतिक शांततेसाठीच करतोय ह्याचे चांगलेच भान असते. दुर्दैवाने आपल्या देशाने त्यांना कधी पद्मश्री, पद्मभूषण किताबाने सन्मानित केले नाही हे आपल्या देशाचे दुर्दैव. कदाचित त्यासाठी सैफ आली खान नावाचा तद्दन भिकार अभिनेता अधिक लायक ठरत असावा.

मित्रानो, टेसी थोमस यांची कहाणी देशातील करोडो स्त्रियांना प्रेरणा देणारी ठरावी. आणि आजही महिलांना " पानी कम " समजणाऱ्या फेसबुकवरील असंख्य महाभागांना एक सणसणीत चपराक ठरावी ज्यांनी मला अनेक वेळा नाउमेद करून माझे पाय खाली खेचायचा प्रयत्न केला. आज इस्रोमद्धे तब्बल बाराशे महिला शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. देशातील करोडो महिलांची मान गर्वाने उंचावणारी त्यांची ती अफाट कामगिरी येत्या काळात महिलांना प्रत्येक क्षेत्रात उंच भरारी घ्यायला प्रेरित करेल याविषयी माझ्या मनात शंकाच नाही..

## माझं सानुलं



माझ्या बागेतलं हे
सुंदरसं सानुलं फक्त
माझ्यासाठी उगवलं,
मी स्पर्श करीता ते
माझ्याशी बोलु लागलं

हसून मज ते बोलती
वाऱ्यासंगे हळूच डोलती
बैस तू मजपाशी हे मन
प्रसन्न होऊनी जाशी

जवळ बसूनी फुलांवरती
हात तुझा फीरतो,उन्हाच्या
या चटक्याने दमून मी जातो

स्तोत्र म्हणूनी माझे
संगोपन केले,फुल होऊनी
देवाच्या मज तू मस्तकी
बसविले...

अलगद तुझ्या स्पर्शाने
मन माझे प्रसन्न होते
कुंडीत डोलत असता
तू मजसी प्रेम किती करते...

-सौ.भाग्यश्री दायमा

## मोबाईल

पोस्टकार्ड लिहायचं
आता सारं बंद झालं ।
हॅलो हॅलो बोलायला
मोबाईल यंत्र आलं ।।१।।

व्हाट्सअपने काहींना
सापडल्या नव्या वाटा ।
कोण पाठवतात फोटो
तर कोण मारतं चाटा ।।२।।

फेसबुकने मिळाले
खूप हजारोंनी मित्र ।
कोण टाकतात कमेंड
काही पाठवतो चित्र ।।३।।

घरातलं बोलणही
तसं महाग झालं आता ।।
चॅटिंगसाठी तर यांना
कमी पडतात राता ।।४।।

संपून जातो पॅक तेव्हा
हरवल्यासारखं वाटतं ।
ईंटरनेटसाठी काळीज
मनातल्या मनात फाटतं ।।५।।

ज्याच्या त्याच्या हातामध्ये
असे बहुआयामी खोकं।
बरोबर नसलं तर
चालत नाही डोकं ।।६।।

-प्रा. डॉ. शिवप्रसाद मीननाथ
घोडके, पालखेड, ता.वैजापूर,
मो.९८२३५३२११४

## झाडे अन् माणसं

ही हिरवी गर्द झाडे
ती अस्थिपंजर झाडे
निरंतर तत्पर असतात
आपलं सर्वस्व माणसाला
अर्पण करण्यासाठी,
त्याना ठाऊक नसते
कृतघ्नता,
वर्ग जाती-धर्मभेद
सावलीत येणाऱ्या माणसात ,
झाडे आपल्यासाठी
संघर्ष जगतात
पालकत्व पत्करतात
ती सारी प्रयत्नरत
वादळ पावसापासून
अंगाखांद्यावर पोसलेली
पाखरांची घरटी
शाबूत ठेवण्यासाठी
स्वतः उन्मळून पडेपर्यंत ,
आता अलीकडे माणस
विकतात दया माया
कधी तर घरची बया
झाडे ऋषीतुल्य असतात
झाडे इमान फिरवणारी नसतात
एवढा काय तो फरक
झाडात अन् माणसात .

-प्रा. रमेश वाघमारे
पुसद, जि. यवतमाळ
मो. ९४२३१३३२५९

## ॐ नमो गणपतये



सकलारंभी प्रारंभा
बुध्दाच्या अधिष्ठाता
नमन तुज करून
कार्यारंभ होतो सफला।।1।।

कर्ता विघ्नहर्ता
चौदा विद्या, चौसष्ठ कलांचा
अधिष्ठाता सकलारंभी प्रारंभा
वंदन करूया लंबोदरा।।2।।

मातापिता, बंधूप्रेम
सकल विश्वाचा पालनकर्ता
हा तुझा संदेश प्रमाण आहे
कालत्रयातीत:या।।3

मोद मिळे तुज वंदना
दुर्वांकुर अर्पिता
परमानंद मिळे
मूषकध्वजा।।4।।

लाडूमोदक,शमिपत्रे
सदैवध्यान सर्वही अर्पूनी
मनोभावे शब्दांची
पूजा बांधली तुज अनंता।।5।।

-सौ. ऊज्वला
धर्माधिकारी, पुणे

## आराधना

करु मिळूनी सारे
बाप्पाची आराधना
पूर्ण होईल पहा
मनातील कामना

बाप्पा माझा मार्गदर्शक
सोबती सदैव असतो
संकटकाळी नेहमीच
मदतीसाठी धावतो

विद्येचा अधिपती
रिध्दी सिध्दीचा दाता
भक्तजनांचा तोचि
खरा भाग्यविधाता

शुभ कार्यारंभी करती
धावा तुझाच रे देवा
मुखी भक्तीभावे भरवती
गोड मोदक, लाडू मेवा

आराधना तुझी करताना
माझा मी ना राहतो
भक्तांच्या डोई नेहमी
आशिर्वादाचा हात ठेवतो

बाप्पा माझा मार्गदर्शक
साऱ्या जगाचा पालक
सुखी, समाधानी ठेव देवा
आम्ही सर्व तुझेच बालक

संध्याराणी जयहिंद कोल्हे
कळंब, मो. 8788591371

## दान दे...!



हिरवी-हिरवी पालवी
वृक्षावरती बहरू दे!
माती हिरवी करण्यास
बेभान पाऊस पडू दे!


पानाफुलांचा शाप नको
पाकळ्यांना वरदान दे !
मिटलेल्या कळ्याफुलांना
उमलण्यास तू भान दे !

वादळवारा झेलणाऱ्या
वृक्षांना मधूर तान दे!
भुईला तृप्त करण्यास
वर्षाऋतुचे तू वान दे!

नित्यनेमाने मिळो चारा
पशु- पक्ष्यांना तू मान दे!
कोसळून पाऊसधारा
काळ्या भुईला सन्मान दे!

नांदत्या हिरव्या रानात
पिकांना तू जीवदान दे!
माणिकमोती पिकण्यास
हे ! नभा, भुईला दान दे...!

-अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४




## स्वातंत्र्यांची ललकारी

भारताचा स्वतंत्रता
अमृतोत्सवाचा दिन ,
आनंदाचा हा उत्सव
माता चरणी हो लीन ...
माझा भारत महान
भारतीय स्वातंत्र्याचा,
रंग हा देशभक्तीचा
अभिमान तिरंग्याचा ...
बाल ,पाल, क्रांतीकार
शूरवीर ते महान,
दिले त्यांनी बलीदान
पराक्रमी हो जवान...
मातृभुमी रक्षणार्थ
येता हाक स्वकीयांची,
एकजूट होऊनीया
हार ती परकियांची. ....
स्वातंत्र्याची ललकारी
एक नारा, देश भक्ती ,
पळवून परक्यांना
एकजूट , एक शक्ती....
निपटून भ्रष्टाचार
सत्य ,अहिंसेला साथ ,
प्रगतीच्या उंचावर
एकमेकां देऊ हात....
तंत्र -विज्ञान, शेतीचा
जगी डंका भारताचा,
माझा भारत महान
अभिमान स्वराज्याचा....

सौ. सुवर्णा पवार ,
इचलकरंजी

## निरोप

निघाले बाप्पा गावाला
खरंच करमेना आम्हाला...

दहा दिवसाचे वास्तव्य छान
घरी होता तुला किती मान...

बालचमुंचा आवडता फार
गळ्यात असे ताजा फुलांचा हार...

सकाळ, संध्याकाळी आरती होता
धुपदिपांचा सुवास होता....

निघालास सोडूनी आम्हाला
चैन पडेना कोणाला...

दाटूनी येती अश्रू नयनी
तुझी मुर्ती समोर पाहूनी...

चुकभुल घेऊनी पदरात
आशीर्वाद दे तु मनात...

वाट पहातो पुन्हा आगमनाची
तयारी करतो तुझ्या येण्याची...

-सीमा मंगरूळे, वडूज

## पोशिंद्याचे दु:ख....

वरुन आभाळ
फाटलेले
भीतीने घर
थाटलेले
डोळ्यांचे बांध
फुटलेले
वसुलीचे तंबु
थाटलेले
मदतीचे पाट
आटलेले
आश्वासनां नी कान
किटलेले
फासात भविष्य
लोटलेले
हळदीचे अंग
गोठलेले
काळजात हुंदके
साठलेले
जीवनाने सर्वस्व
लुटलेले

बळराज संघई, संपर्क क्र. ९४२००८५९८०

## सांग ना कविते

सांग ना कविते
का ? कवी
तुझ्या प्रेमात पडतो
का ?
कवीला तू खूप आवडते
तो तुझ्यावर
स्वतःपेक्षाही जास्त
प्रेम का करतो

सांग ना कविते
कसे जुळते नाते
तुझे अन् कवीचे
इतके जिव्हाळ्याचे

सांग ना कविते
कोण तुझा तो कवी
सखा, प्रियकर , धनी
की जन्मदाता

सांग ना कविते
तू कवीच्याच
अंतःकरणातून
कशी स्फुरते

सांग ना कविते
तू अप्रतिम
सौंदर्याने नटून

सुंदर का दिसते

सांग ना कविते
का ? कवीच्या
प्रत्येक श्वासात रमते

सांग ना कविते
नाठाळाच्या घरीच
पाणी भरते
त्याच्या विचारांचीच
बाग फुलवते


सांग ना कविते
तुझे नी कवीचे
कसे जुळते
तो तुला कागदावर
उतरवतो कुरवाळतो
आणि तू
समर्पित होते

सांग ना कविते
का अन् कशी तू
कवीच्या जीवनाची
गाथा होते

सांग ना कविते
कवीच्या सुखदुःखात
तुझी सोबत
कसे त्याचे जीवन घडवते

सांग ना कविते
हळव्या मनाला
तुझा लळा का लागतो
यालाच प्रेम म्हणतात का ?

सांग ना कविते....
सांग ना कविते. ....
-चंद्रशेखर प्रभाकर कासार
चांदवडकर, धुळे,
7588318543




आधुनिक केसरी



श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568


**अ) गणिताची मूलभूत संकल्पना :** संख्यांचे प्रकार

**17) पूर्णवर्ग किंवा चौरस संख्या :** पूर्णवर्ग असणाऱ्या संख्यांनाच चौरससंख्या म्हणतात.
उदा. 1, 4, 9, 25, 36, 225, 625... इत्यादी.

**18) बेरीज व्यस्त किंवा विरुद्ध संख्या :** ज्या दोन संख्यांची बेरीज शून्य असते त्यांना एकमेकींच्या बेरीज व्यस्त किंवा विरुद्धसंख्या म्हणतात.
उदा. (+8) + (-8) = 8-8 = 0
(+8) आणि (-8) या परस्परांच्या बेरीज व्यस्त किंवा विरुद्ध संख्या आहेत.

**19) गुणाकार व्यस्त संख्या :** ज्या दोन संख्यांचा गुणाकार एक असतो, त्यांना एकमेकींच्या गुणाकार व्यस्त संख्या म्हणतात.
उदा. 4x4/4=4/1x1/4=1
4 आणि 1/4 यांचा गुणाकार १ येतो. म्हणून त्या एकमेकींच्या गुणाकार व्यस्त संख्या आहेत.

लक्षात ठेवा : 1) शून्याला बेरीज व्यस्त व गुणाकार व्यस्त संख्या नसते.
2) धन संख्येची बेरीज व्यस्त (विरुद्ध) संख्या ऋण असते आणि ऋणसंख्येची बेरीज व्यस्त संख्या धन असते. (तीच संख्या असते फक्त चिन्ह विरुद्ध असते.
3) अंशस्थानची गुणाकार व्यस्त संख्या एक छेदस्थानी तीच संख्या लिहितात. तसेच एक छेदस्थानची गुणाकार व्यस्त संख्या तीच अंशस्थानी लिहितात.




**ब) गणिताची मूलभूत संकल्पना प्रश्नसंच :**
प्रश्न : जोड्या लावा

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| 1) पूर्णवर्गसंख्या | अ) 8 |
| 2) ४ ची गुणाकार व्यस्त संख्या | ब) 64 |
| 3) (-7) ची बेरीज व्यस्त संख्या | क) -5 |
| 4) 1/8 ची बेरीज व्यस्त संख्या | ड) 1/4 |
| 5) 5 ची बेरीज व्यस्त संख्या | इ) 7 |

क) उखाणा 1) पुरुष शब्दाचा समानार्थी शब्द आहे मर्द, संख्येचा वर्ग केल्यानंतर येणाऱ्या संख्या असतात पूर्णवर्ग
2) आहार शब्दाचा समानार्थी शब्द आहे खाद्य. बेरीज शून्य असणाऱ्या संख्या असतात एकमेकींच्या विरुद्ध.
ड) कविता क्रमांक १२.

# गणेशोत्सव कालचा आणि आजचा



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

**श्री गजानन ही बुध्दीची देवता आहे तिला प्रसन्न करून घेणे हे सर्व समाजाचे काम आहे. समाज प्रबोधन व्हावे या ऊद्देशाने लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी 1893 ला पुण्यातील विंचुरकर वाड्यात सार्वजनिक गणपती ऊत्सव सुरू केला. 1894 मध्ये100 च्या वर सार्वजनिक गणपती मंडळाची स्थापना झाली. या ऊत्सवात बाप्पाची पूजा करणे अथर्वशीर्ष शालेय विद्यार्थ्यां कडून म्हणवून घेणे,पोवाडे म्हणून त्यातछन समाज प्रबोधन करणे मेळावे घेऊन एकत्र रहाण्याची सवय करणे एकमेकांना समजून घेणे एकमेकांना साथ देणे हा त्यामागचा ऊद्देश होता.**

तेव्हा पारतंत्र्याचा काळ होता. ब्रिटिश सत्ता झुगारून देणे व "स्वतंत्र भारत" होणे हे प्रत्येक भारतीयांचं स्वप्न होतं.सार्वजनिक ठिकाणी गणपती बसवले तरसमाज लवकर एकत्र येईल अशा विचारधारेने प्रेरित होऊन लोकमान्य टिळकांनी विंचुरकर वाड्यात सार्वजनिक गणेश ऊत्सवाला1893 मध्ये सुरवात केली.1894 ला 100 च्या वर सार्वजनिक गणपती मंडळाची स्थापना झाली. सार्वजनिक गणेश ऊत्सव सुरू झाल्यावर 1894 ला गणपतीचे 9 दिवस व्यवस्थित पार पडलेपण पुण्यातील दारूवाला पुलावर आदल्या रात्री मोठी दंगल होऊन त्यात एकाचा म्रुत्यु व पुण्यात तणावाचे वातावरण होते. ब्रिटीश कालीन कलेक्टर ओम्यानी यांनी मिरवणूक काढण्यासाठी परवानगी दिली पण समाजातील काही लोकांचा त्याला विरोध होता. तेव्हापासून रे मार्केट (आताचे महात्मा फुले मार्केट)सर्व गणपती मंडळे मंडळाच्या लोकांना एकत्र जमण्यास सुरवात केली.त्यात ग्रामदेवता कसबा गणपतीला प्रथम मान दिला. कारण राजमाता जिजाऊ पासू या गणपतीला प्रथम पूजेचा मान दिलेला आहे. नंतर गुरूजी तालीम,तुळशीबाग,केसरीवाडा हे पहिले पाच मानाचे गणपती तर भाऊ रंगारी,अखिल मंडयी ,श्रीमंत दगडूशेठ हलवाई असा विसर्जन मिरवणुकीसाठी मार्ग ठरवून दिला. तो आजतागायत चालू आहे. 1896ते1808सर्वत्र प्लेगच्या साथ होती 1900मध्ये प्लेग व दुष्काळामुळे मंडळाची संख्या कमी झाली. पण गणेशोत्सव थांबला नाही. 1908ला लोकमान्य टिळकांना मंडालेच्या तुरूंगात शिक्षा सुनावली. 1912मध्ये इंग्रजी सरकारने एक जाहीरनामा काढला की ऊत्सवात देवाखेरीज इतर ऊच्चार ही करायचा नाही. स्वातंत्र्याच्या ध्येयाने प्रेरित झालेले स्वातंत्रसैनिकांच्या पण इंग्रजांच्या द्रयुष्टीने राजद्रोही असणारेंचा  फोटो लावायचा नाही, सरकारी नोकर,शिक्षक यांनी ऊत्सवात सहभागी व्हायचे नाही. असे एक ना अनेक बंधन घालून इंग्रजी सरकारने आपल्या ऊत्सवाला कडक निर्बंध घातले.पण ऊत्सव थांबू दिला नाही. 1916ला पाऊस व प्लेगची साथ माणंसं करोनात मरत होती तशीच प्लेगच्या साथीत पण अक्षरशः किड्यामुंग्या सारखी गेली.



1ऑगस्ट 1920ला टिळकांचा म्रुत्यु झाला. पण ऊत्सव नेहमीच्या प्रमाणे पार पडला. ईथे मला एक विषेश सांगावेसे वाटते की हिंदूनी ताबुतापुढे मेळे केले. आज सांगायला अभिमान वाटतो की गणपती व ताबुत शेजारी शेजारी बसवले जात होते. दोन्ही धर्माचे लोक दोन्ही ऊत्सवात आनंदाने सहभागी व्हायचे. आनंद देणे व आनंद घेणे हा ऊत्सवाचा खरा अर्थ समजला होता.


1942 कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. चळवळी मुळे ऊत्सवावर बंधने आली सर्वत्र संचार बंदी होती अखेर न,चि, केळकर डावरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते यांच्या प्रयत्नाला यश मिळून 3नोव्हेंबर1942ला म्हणजे तब्बल 42दिवसांनी मिरवणूक काढण्यात आली मिरवणूकीला परवानगी मिळाली. व निर्विघ्नपणे मिरवणूक पार पडली.पुढे 1947ला स्वातंत्र्य मिळाल्यावर मंडळाची संख्या300पर्यन्त वाढली. 1948ला  हैदराबाद च्या निजामाची शरणागती ची बातमी अनंतचतुर्दशीला मिळाली त्यामुळे विसर्जन मिरवणूक आनंदाने पार पडली.

1951ते 1960हा गणेशोत्सव ाचा सुवर्ण काळ म्हणता येईल. मेळावे,पोवाडे समाजप्रबोधन होईल असे वातावरणात गणेशोत्सव साजरा होत होता. 1965 मध्ये युद्ध सुरू झाले. दंगल,कर्फू,गोळीबार यासर्व संकटावळमात करत गणेश ऊत्सव व मिरवणूक पार पडली. पुढच्या दशकात पण आलेल्या संकटातून मार्ग काढत ऊत्सव सुरू होता. 1980ला कसबा गणपती ने समाजासमोर एक आदर्श मार्ग घालून दिला तो म्हणजे मिरवणूकी गुलालाचा वापर पूर्ण पणे बंद केला फक्त अष्टगंधाचा टिळा प्रत्येक भाविक भक्ताला लावायचा पायंडा पाडला हा फारमोठा आदर्श समाजासमोर घालून दिला. 1983साली कसबा गणपती चांदीच्या पालखीत विराजमान झाल तर मिरवणुकीत चांदीची पालखी हे फार नवलच होते त्या वेळी लक्ष्मी रोडवर कसबा गणपती चांदीच्या पालखीतून जाताना पहाणे हा फार कौतुकाचा विषय त्याकाळी होता. 1985मध्ये शिस्तबध्द गणेशोत्सव व मिरवणूक व्हावी यासाठी प्रत्येक मंडळाला ठरावीक ठिकाणी किती वेळ थांबायचे यासाठी वेळ ठरवून दिली. 1989,90मुलींचा महिलांचा सहभाग वाढला. 1992हे सार्वजनिक गणेशोत्सवाचे शताब्दी वर्ष होते.खूप धुमधडाक्यात मंडळाची आरास,समाजप्रबोधन, पर देखावे,जनजागृती, रक्तदान शिबीर, मुलगी मुलगा भेदभाव नको बेटी बचाओ बेटी पढाओ असे ऊपक्रम राबवले. कार्यकर्ते तयार होऊन जनजागृती केली. प्रदुषण मग ते मनाचे असो नाही तर निसर्गाचे असो कमी करणे यासाठी समाज एकत्र येणे गरजेचे बनले. 1998पासुन ध्वनिप्रदूषण, डीजे, डॉल्बी जाहिराती प्रायोजकांचा प्रभाव वाढला कुठेतरी धार्मिक भावना बाजूला पडल्या. चंगळ वाढला सक्तिची ऊत्सवाची वर्गणी गोळा केली जाऊ लागली.दारू पत्ते, जुगार या अनावश्यक गोष्टींना प्रतिष्ठा मिळत गेली. टिळकांच्या मुळ हेतुला तडा जाऊ लागला. समाजातील हौसेगौसे नवशे सगळे या विक्रुत गोष्टींत आपली हौस भागवून घेऊ लागले. 2009ला स्वाईनफ्लूमुळे प्रथमच विद्यार्थ्यांना मिरवणुकीत न घेता मिरवणूक काढली.वंदे मातरम् च्या शताब्दी ऊत्सवामूळे जनमानसात प्रभाव पडला. 1910 पासुन मोबाईल चा वापर वाढला. संस्कृती जोपासणे ती वाढवण्यासाठी आदर्श विचार समाजात रूजवणे,समाजातील बंधूभाव वाढीस लावणे. सौद्ह्याचे वातावरण तयार करणे. सार्वजनिक ऊत्सवात लहान मुलावर चांगले संस्कार होणे गरजेचे आहे चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, पाठांतर स्पर्धा, जेणेकरून निकोप व सुद्रुढ समाज तयार होईल असे  स्वरूप असावे. ही अपेक्षा करून अजूनही बरेच काही करणे गरजेचे आहे. समाजात अशी जाग्रुती होईल बाप्पा सर्वांना चांगली बुध्दी देईल. अशी अपेक्षा करून गणेशाला वंदन करूयासर्वाना चांगली बुद्धी दे.

# लोप पावत चाललेली परंपरा : भुलाबाई

आधुनिक केसरी

भाद्रपद पोर्णिमेला भुलाबाईचे आगमन होते भुलाबाई भूलोजी म्हणजे शंकर पार्वतीचे दूसरे रूप भाद्रपद पोर्णिमेंपासून तर कोजागिरी पोर्णिमेपर्यंत असा हा महीनाभर चालणारा भुलाबाई उत्सव हा उत्सव खानदेशात मोठ्या हौसेने साजरा केला जातो पण आत्ताचा काळ बघता घरोघर दिसणाऱ्या भुलाबाई सहसा आढळत नाहीत मोबाईल, कंप्यूटर आल्यामुळे आत्ताच्या मुलींना भुलाबाई काय हे सुद्धा ठाउक्क नसते भुलाबाई परंपरा दिवसेंदिवस मागे पडत आहे, जर कधी कोणाच्या घरी भुलाबाई दिसलीच तर ती मुलगी आपल्या आईला सहज विचारते हे काय आहे म्हणून, तेंव्हा आई सांगते पण त्याआधी नाही सांगत आपल्या मुलांना मोबाईल सोबतच आपल्या परंपरा संस्कृतिबद्दल सुद्धा माहिती असावी, लहानपणीचे दिवस आठवले की परत भूतकाळात जावे वाटते भुलाबाई बसवावी वाटते बालपणीची गोष्टच काही वेगळी होती चार दिवस आधीपासून भुलाबाईची तयारी सुरु व्हायची भुलाबाईला फूलहार करण्यासाठी मुली वेगवेगळ्या प्रकारची फुल शोधताना दिसत गणपती विसर्जन झाले की दुसऱ्या दिवशी म्हणजे भाद्रपद पोर्णिमेंला भुलाबाईची स्थापना केली जायची म्हणजे आत्ता पण करतात भुलाबाई सोबत भूलोजी बसलेले अशी मनमोहक मुर्ती बाजारातून आणली जात असे त्यासोबत बाळ त्याच्यासाठी सुंदरअसा झोका असायचा आणि त्याच बरोबर राधा कृष्ण अशे एका ठिकाणी ठेऊन फुलांच्या माळा घालून पूजा केली जायची मुलीमुलींचा ग्रुप असायचा त्यातल्या सर्वजणी भुलाबाई बसवायच्या मग रोज संध्याकाळी ऐकेकिच्या घरी जाऊन भुलाबाईची तिच्यासामोर टिपऱ्या वाजवुन नाचत गात गाणी म्हटली जायची.



कविता चव्हाण
संपर्क क्र. 9370062031

आपे दूध तापे
त्यावर पिवळी साय
लेकी भुलाबाई
साकळ्याचा जोड
कशी लेउ दादा
घरी नंदा जावा
करतील माझा हेवा

त्यानंतर चार गाणी म्हटली की भुलाबाईची आरती करत असत

भाद्रपदेचा महीना आला
आम्हा मुलींना आनंद झाला
पार्वती बोले शंकराला
चला हो आपल्या माहेराला

आरती झाल्यावर घरातील मुलगी हवा बंद डब्यात खाऊ आणायची आणि त्या डब्याला हलवुन मुलींना खाऊ ओळखण्यास सांगत असे त्यातल्या प्रत्येक मुलीला वाटे आपण हिच्या पेक्षा कठीण खाऊ करू, असा मुलींचा नेहमी प्रयत्न असायचा खाऊ जिंकून झाल्यावर आधी प्रसाद भुलाबाई समोर ठेवला जायचा नंतर सर्व मुलींना वाटून खाल्ला जायचा मग नंतर पूर्ण मुलींचा ग्रुप दुसऱ्या मुलीच्या घरी भुलाबाईची गाणी म्हणायला निघायचा असा हा भुलाबाई उत्सव एक महीना भर चालणारा असतो.

# ... अन् बोरं आंबट झाली

आधुनिक केसरी

माझ्या गावात हायस्कूल नसल्यामुळे मी वर्गमित्रासोबत सातवी पास झाल्यानंतर शेजारच्या पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या गावात इयत्ता आठवीच्या वर्गात प्रवेश घेतला. पंचक्रोशीतील ते एकमेव माध्यमिक विद्यालय असल्यामुळे जवळपासच्या खेड्यातील मुलं त्या शाळेत प्रवेश घेत असत. आम्ही सर्व खेडेगावातील मुलं दुपारच्या सुट्टीत जेवण लवकर आटपून जवळच्या शेतात बोरं खाण्यासाठी जात असू. आमच्या शाळेतील क्लार्क सरांचे ते शेत असल्याने कोणीही आम्हाला अडवत नव्हते. कधी कधी बोरं खाण्याच्या नादात इकडं शाळेची घंटा वाजायची व तिकडे शाळा भरायची पण लक्षात येत नसे व उशीर झाल्यामुळे छडीचा प्रसाद की त्या प्रसादाने आम्ही खऱ्या अर्थाने घडलो तो मिळत असे. कधी कधी दुपारच्या सुट्टीत बोरं खाण्याची इच्छा पूर्ण होत नसे म्हणून काही मुलं दुपारनंतर शाळेतून पळून जात व बरोबर शाळा सुटेपर्यंत बोरं खात व नंतर घरी जात असे..त्याचा फायदा असा होता की घरी आई बापाला असे वाटत असे की पोरगं शाळेतून सरळ घरी आलं.



ज्ञानेश्वर गायके
मो.नं. 9403384889

असेच एक दिवस मला ही वाटले की आज मनसोक्त  बोरं खाण्याचा आनंद घ्यायचा. शेवटी जीवनात आनंद महत्वाचा म्हणून मी गावातील वर्गमित्रासोबत दुपारच्या सुट्टीत जेवण झाल्यानंतर रस्त्याने बोरं वेचत  घराकडे निघालो.त्या दिवशी सायकल नसल्याने पायी पायी पाच किलोमीटर अंतर पार करून असे ही घरी जाणे होतेच म्हणून सावकाश बोरं गोळा करणे चालू होते.

गोणपाटाची पिशवी की जिचा दप्तर म्हणून उपयोग होत असे. ती बोरांनी भरवली व भाकरीचे फडके की जे रिकामे होते त्यात ही बोरं भरवणे चालू केले.तितक्यात माझे चुलते बाहेरगावी गेले होते ते सायकल वरून घरी जातांना त्यांनी मला पाहिले व आमच्या जवळ येऊन उभे राहिले. चुलते समोर पाहून मी गर्भगळीत झालो. मार खाण्याच्या भीतीने हात पाय लटलट कापायला लागले.आता फक्त कानफटात बसण्याचा उशीर पण काय झाले कुणास ठावूक त्यांनी मला मारले नाही व प्रेमाने आमच्याशी बोलून आम्हाला सायकलवर बसवून घरी घेऊन आले.

सुटलो बा एकदाचा.. या विचाराने मी सुटकेचा निःश्वास सोडला पण संध्याकाळी वडील रानातून घरी आले.त्यांनी मला विचारले की आज घरी केव्हा आला व शाळेत पूर्ण वेळ होता का ?त्यांच्या या प्रश्नाचे उत्तर माझ्याकडे नव्हते कारण मला हे समजले की वडिलांना आपला आजचा कारनामा माहित झाला आहे.व त्यानंतर मला फटके मारणे सुरू झाले..शाळा बुडवून बोरं खाल्ले म्हणून.. अन त्या दिवसापासून शाळेतून पळून जाऊन बोरं खाण्याची सवय सुटली ती कायमची व त्या दिवसापासून बोरं ही आंबट झाली की ती पुन्हा गोड लागलीच नाही.

# आलो याचि कारणासी ।

तुकारामनीती
भाग 25



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

पृथ्वीतलावर अनंत जड-जीव असून त्यात मनुष्य हा सर्वश्रेष्ठ प्राणी गणला गेला, परंतु हे प्रमाणसुद्धा माणसालाच द्यावे लागते, कारण इतर प्राणी आणि माणसांत तोच मुलभूत भेद आढळून येतो ! श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच, भेदा-भेद हा इतर प्राण्यांमध्ये आहे कि नाही ? असे एक ना अनंत प्रश्न सातत्याने सतावत असतात. या सर्वच प्रश्नांच्या मुळाशी अगदी मुलभूत प्रश्न म्हणजे आत्तापर्यंत माणसानेच माणसाला अनंत प्रश्न विचारून निरुत्तर केले आहे ! आज भोवताल एवढी माणसं उच्च शिक्षित आणि उच्च-विद्याभूषित असतांना काही जणांच्याच मुशीतूनच एखादी कलाकृती किंवा निर्मिती का बाहेर येत असावी ? एखादाच उच्चशिक्षित-अल्पशिक्षित सृजन कथा, कविता, कादंबरी, निबंध किंवा चिंतन का लिहित असावा ? हे प्रश्न जसे आजही अनुत्तरीत आहेत किंवा याची विविध उत्तरं असतांना, सतराव्या शतकांत संत तुकोबांच्या समोर आपल्या लिहिण्या-बोलण्या संदर्भात अनंत प्रश्नांचे वादळ उभे राहिले असावे ! या वादळाने अनेकवेळा तुकोबा रात्रभर रानोमाळ भंडारा डोंगरावर भटकंती करत असावेत ! जो माणूस स्वतःच्या शोधार्थ फिरत असतो त्याला इतर काहीच दिसत नाही. मग तो एकांती आणि लोकांती केवळ आणि केवळ स्वतःच्या शोधात असतो ! माणसासाठी मला हाच शोध मुलभूत स्वरूपाचा वाटतो ! बरेच महानुभाव दुसऱ्याच्या दोष आणि दुर्गुणांच्या गाथा वाचता वाचता आपल्या वाणीचा दोष वाढवत जातात आणि नंतर त्याचाच त्यांना त्रास होऊन विविध शारीरिक आणि मानसिक व्याधींना सामोरे जावे लागते. हे सर्वांना कळते, मात्र वळत नाही !

असेच प्रश्न संत तुकाराम महाराजांना पडत असावेत, परंतु त्यांच्या प्रश्न आणि उत्तराची अभंग-गाथा निर्माण झाली, तर दुसरीकडे सामान्य माणसांनी आपलाच माथा चिंताग्रस्त करून सोडला ! हाच मोठ्या नी छोट्या विचारांच्या लोकातील फरक ! आपण कोण ? इथं का आलो ? आपले कार्य काय ? आणि कुठे जाणार आहोत ? असे एक ना अनंत प्रश्न तुकोबांना सतावत असतांना, डोंगरावर अगदी एकांतात तुकोबांच्या अंतर्मनाने दिलेली निखळ साद म्हणजे प्रस्तुत अभंग !

आम्ही वैकुंठवासी । आलो याचि कारणासी । बोलिले जे ऋषी । साच भावे वर्ताया ॥१॥ झाडू संताचे मारग । आडरानी भरले जग । उच्छीष्टाचा भाग । शेष उरला तो सेवू ॥धृ॥

अर्थे लोपली पुराणे । नाश केला शब्दज्ञाने । विषयलोभी मने । साधने बुडविली ॥२॥ पिटू भक्तीचा डांगोरा । कळीकाळासी दरारा । तुका म्हणे करा । जयजयकार आनंद ॥३॥ (शा.अ.गाथा अ.क्र. ५२०) वरील सर्वच मुलभूत प्रश्नांची उत्तरे या अभंगात सापडतात. स्वर्ग-नरक, वैकुंठ-कैलास आदि विविध शब्दांच्या अनुषंगाने विविध ग्रंथांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची मिथकं आढळून येतात. आपल्या अभंगात वैकुंठ या शब्दाचा उल्लेख आल्यामुळे इथे आपण पुराणातील इतर शब्दांचा उहापोह करण्याऐवजी केवळ 'वैकुंठ' या शब्दाचा विचार करणार आहोत. तसं पाहिलं तर, हे शब्दवाङमयीन दृष्ट्या माणसांना काल्पनिक प्रदेशात किंवा तशा वातावरणात घेऊन जातात. हे सर्व प्रदेश कुणी पहिले अथवा अनुभूतीपूर्ण नाहीत. याचा अध्यात्म किंवा वाङमयीन दृष्ट्या अर्थ पाहणेच उचित राहील. वैकुंठ शब्द अथवा या अनुषंगाने ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलात एकूण २२ श्लोक आले आहेत.

प्रातर्युजा वि बोधयाश्विनावेह गच्छताम् । अस्य सोमस्य पीतये ॥
या सुरथा रथीतमोभा देवा दिविस्पृशा । अश्विना ता हवामहे ॥

या सर्वच २२ सुक्तांमध्ये वैकुंठ म्हणजे, "जिथे श्री भगवान विष्णू यांचा वास आहे ते वैकुंठ ! त्याचबरोबर जिथे निराशा, निष्क्रियता, आळस यांचा संपूर्णतः अभाव असतो ! तसेच तिथे केवळ आनंद आणि तेजोमय विचार सतत प्रविष्ठ असतात ते वैकुंठ !" याचा अर्थ असा कि, जगद्गुरू तुकोबांना वेदांचा अभ्यास होताच, त्याचबरोबर त्याची पूर्णतः जाणही होती ! त्यांना वैकुंठ काय आहे ? हे ज्ञात होते. काही प्रमाणात आपल्याला आपला शोध लागला कि; कृतज्ञभाव प्रकट होतात ! आपण आपले मूळ शोधून त्या अनुषंगाने पुढे जात असतो. अगदी याच आशयाचा एक श्लोक ईश्यावास्य उपनिषदात आलेला दिसून येतो.

पूषन्नेकर्षे यम सूर्य प्राजापत्य व्यूह रश्मीन् समूह ।
तेजो यत्ते रूपं कल्याणतमं तत्ते पश्यामि योऽसावसौ पुरुषः सोऽहमस्मि॥ म्हणजेच सत्याचा किंवा स्वतःचा शोध घेणारा सर्वत्र सूर्य पहात असतो. त्याच्यातील भ्रम नष्ट होऊन तो केवळ सूर्याचे तेजोवलय पहात असतो. तो तेच तेजोवलय होऊन जातो ! त्याच्या जीवनात केवळ सत्य आणि ज्ञानाचा प्रकाश प्रविष्ठ होतो ! तो त्या दिव्य-ज्योतीशी एकरूप होतो !" हीच जीवात्मा ऐक्याची प्रक्रिया होय ! स्वतःचा शोध घेणाऱ्या माणसाची ही अवस्था झाली कि; मग त्याला संत तुकोबांच्या वरील अभंगाची अनुभूती होऊ शकते ! संत तुकोबाराय या सर्वोच्च अनुभूतीच्या ठिकाणी विराजमान होऊनच वरील अभंग लिहितांना दिसतात ! तुकोबाराय वैकुंठावरून आलेत म्हणजेच त्यांनी त्या अवस्थेला पोहचून आपण काय काय करणे उचित आहे (?) याचे मनोमन अवलोकन केलेले आढळून येते. त्यामुळेच ते स्वतः या परमोच्च अवस्थेला जाऊन अभंग लिहू शकले. वैकुंठावरून आलेल्या माणसाने काय करणे अपेक्षित आहे ? याचे उत्तर तूकोबांनी देतांना, आपण ऋषी-मुनींची शिकवण आहे, ती शिकवण घेऊन पुढे जाणे अपेक्षित आहे. संतांनी जे महान कार्य केले त्याच मार्गाने जातांना त्यांचे मार्ग स्वच्छ करण्याचे कार्य आपण करूयात.

परंतु या अलौकिक अभंगातील अर्थे लोपली पुराणे । नाश केला शब्दज्ञाने । विषयलोभी मने । साधने बुडविली ॥२॥

हे चरण अत्यंत महत्वाचे आणि वाचकांना विचारप्रवण करणारे आहे. माणसं विविध ग्रंथाच्या अर्थाच्या शोधातच आडकले आहेत, परंतु त्या अर्थाचा अंगीकार होत आहे का ? सर्वत्र शब्दांचा प्रपंच करणारे पोपटपंची तयार झाले आहेत ! सगळीकडे कीर्तन-प्रवचन-व्याख्यान यांची रेलचेल झालेली असतांना त्या प्रमाणात बदल का घडून येत नाहीत ? या प्रश्नांचे उत्तर म्हणजे आपण सगळेच पोपट झालो आहोत ! त्या ज्ञानाचा अंगीकार कुणीही करतांना दिसून येत नाही. सगळे पोपट विषयाच्या मागे



धावत आहेत, परिणामी होणाऱ्या कीर्तन-प्रवचन-व्याख्यानाचा शून्य प्रभाव जाणवत आहे ! जो तो पैसा-ऐश्वर्य-कीर्ती याच्या मागे रात्रंदिवस धावत आहे ! सर्व प्राप्त आहे मात्र समाधान शून्य माणसं भोवताल पळतांना पाहून मन व्यथित होते ! माणसांकडे साधने उपलब्ध झाली मात्र त्या साधनांनी सुख-शांती-समाधान मिळण्याऐवजी दुःख-अशांतता-असमाधान यांनीच गर्दी केलेली आढळून येते आहे ! करोडोंचे मालक, लोकांना तत्वज्ञान पाजळणारे तत्वज्ञ लोक व्यसन-आत्महत्या सारख्या गोष्टीना कवटाळत आहेत ! सांप्रतकाळी ही फार मोठी भीतीदायक परिस्थिती असून, भविष्यात हे असेच घडत राहिले तर इतर दवाखाने बंद करून वेड्यांची इस्पितळे उभारावी लागतील ! भविष्यासाठी ही धोक्याची घंटा असून माणसाने वेळीच स्वतःच्या मोह आणि विषयांना आवर घालणे क्रमप्राप्त झाले आहे ! त्यामुळे साधनांचा धुमाकूळ कमी करून माणसं अंतर्मनाकडे कसे वळतील (?) यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे !

या सर्वच नश्वर साधनांचा त्याग करून माणसाने भक्ती म्हणजेच स्वसामर्थ्य वृद्धिंगत करावे लागेल ! महात्मा भगवान बुद्धांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे "अतः दीप भवः" म्हणजेच आपण सर्वांनी स्वयंप्रकाशित होऊन हा प्रकाश सर्वत्र प्रसारित करावा लागेल ! असे झाल्यास माणूस आनंदी राहून तो खऱ्या अर्थाने भक्तीच्या पंथावर चालू लागेल ! संत तुकोबांचे सर्वच अभंग हे दैनंदिन जीवनातील व्यवहारात उपयोगी आणतांना आपले वर्तमान कसे सुरक्षित होऊन आपण आनंदी राहू (?) यासाठी प्रयत्नरत रहाणे गरजेचे वाटते. हा अभंग बऱ्याच लोकांच्या पाठांतरातील असून याद्वारे लोकांना तुकोबांचा वर्तमानासाठी संदेश देणे गरजेचे आहे. तुकाराम नीती लिहित असतांना विविध अभंगांचे अर्थ आणि त्यांचा मतितार्थ शोधतांना बऱ्याच प्रश्नांना सामोरे जाण्याचे क्षण येत आहेत. त्यांच्या अभंगांचे संदर्भ केवळ दर्शनी न लावता ते अभंग वाचक-चिंतकांना अंतर्बाह्य बदलवण्याचे काम करतील का ? असा प्रश्न निर्माण होणे साहजिक आहे. तेंव्हा, आजघडीला माणसांची सर्वच क्षेत्रात रेलचेल झाली असून दिखावा करण्याचे प्रमाण वाढले आहे ! सगळीकडे हा दिखावा वाढला असतांना माणसांनी केवळ अर्थांच्या मागे न लागता त्या अभंग तत्वांचा काही प्रमाणात जरी अंगीकार केला तर निश्चितच त्याचा परिणाम माणसांच्या दैनंदिन जीवन आणि त्याच दृष्टीने होणाऱ्या विविध बाबींवर झाल्याशिवाय राहणार नाही. या लिखाणामागे हाच महत्वाचा उद्देश असून तो माझ्यासह वाचकांनासुद्धा उपयोगी आल्यास त्याचे सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही ! तेंव्हा, चला, आपणही वैकुंठावरून आलो असून संतांनी आखून दिलेल्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न करूयात ! असे होणे म्हणजेच प्रत्यक घर स्वर्ग होणे होय ! घराघरातीलनिराशा, निष्क्रियता, आळस इत्यादी गोष्टी संपून तेथे केवळ आनंद आणि तेजोमय विचार नांदतील ! सगळीकडे आनंदाचे डोही आनंद तरंग अवस्था निर्माण होईल ! जय तुकोबाराय !


**(टीप: लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# धुळे : कॉलर पकडणारा वाहतूक पोलीस अखेर निलंबित

आधुनिक केसरी

धुळे : सध्या धुळे शहरात पोलीस दल धडाकेबाज कामगिरी करत आहे . एकिकडे एसपी प्रवीणकुमार पाटील पोलीस दलाचे नाव उंचावत असताना दुसरीकडे वाहतूक पोलीस दिनेश चौधरी त्याच नावाला बट्टा लावण्याचे पातक करत होते . वाहतूक व्यवस्था सांभाळताना विनाकारण वाहतुकीची कोंडी करणे वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवणे गुंडगिरीची भाषा वापरणे , लोकांची कॉलर पकडण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती . यासंदर्भात वारंवार तक्रारी होऊ लागल्याने एसपी प्रवीणकुमार पाटील यांनी अखेर पोकॉ . दिनेश चौधरी यांना निलंबित केले आहे . पोलीस निरीक्षक धीरज महाजन यांच्याकडे धुळे वाहतूक विभागाची धुरा आहे . ते भलेही प्रामाणिकपणे कार्य करत असतील . पण त्यांच्याच वाहतूक विभागातील काही जण आजही नियम धाब्यावर बसवून मनमानी करत आहेत . त्यांच्यासाठी महत्त्वाचा वाहतुक पोकाँ. विषय आहे शाखे चे दिनेश आदी भागात धुमाकूळ घातला होता . महामार्गावर चौधरी यांनी पारोळा रोड चौफुली चाळीसगांव रोड चौफुली गावांच्या विशेषतःवाहनांना अडवून त्यांना वेठीस धरणे , नियमांच्या आडोशाने धमकावणे दंडाची रक्कम भरूनही पुन्हा दंडाची रक्कम भरण्याचा मॅसेज अनेक वाहनधारकांना यायचा अशा काही तक्रारी त्यांच्या विरोधात प्रचंड वाढल्या होत्या . वाहनचालकाची गचांडी धरणे पडले महागात ! पोकॉ . दिनेश चौधरी नाहक त्रास दिला आहे किरकोळ कारणांवरूनही ते लोकांना अडवून धरायचे यातून बऱ्याचदा हमरी तुमरीपर्यंत विषय जायचा ड्युटीवर पोकॉ . यांनी एका वाहनचालकाची गचांडी धरली होती . तो फोटो सोशल दिनेश मीडियावर जोरदार व्हायरल झाला पोलीस दलच गुंडगिरी करत असल्याचा आरोप नागरिकांनी तेव्हा केला होता यासंदर्भात पोलीस अधीक्षकांकडे तक्रार प्राप्त झाल्याने त्यांनी याप्रकरणाचा गांभीर्याने तपास केला . या आरोपांमध्ये प्रथमदर्शनी तथ्य आढळून आल्याने कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक प्रवीणकुमार पाटील यांनी पोकॉ . दिनेश चौधरी यांना सस्पेंड केले आहे.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## हनिमून भाग - २

आधुनिक केसरी

यामध्ये अजूनएक ऑडिशनल अशी हॅण्डबॅग घेता येईल ज्यात, बीचवर फिरायला जाताना, महत्त्वाच्या ज्वेलरीज ठेवल्या जाऊ शकतात किंवा एखादी छोटी पर्स जी खांद्यावर टाकता येऊ शकेल. ज्यामध्ये महत्त्वाचे पेपर्स, पासपोर्ट, आय.डी.प्रूफ व कॅश ठेवता येऊ शकेल जे की जास्त सुरक्षित असेल.

**स्कर्ट किंवा ड्रेसेस कसे असावेत ?**

सहजतेने घातला वा काढता येतील असे कपडे असावेत. ज्याला आपण नेटेड पॅटर्न (जाळीदार) तसेच तो चांगला आकर्षक असेल याची काळजी घ्यावी.

**पॅन्ट :** कॉटन किंवा लिननच्या पॅन्ट्स किंवा लाईट वेट डेनिम वापरावे आणि त्याचा रंग सहसा पांढरा असावा. सहसा स्ट्रेचेबल फॅब्रिरीक असेच वॉश ॲण्ड वेअर असे असावेत. विनाकारण बॅगेचे वजन वाढेल अशा जीन्स पॅन्ट्स घेऊन जाऊ नये.

**शॉर्टस :** २ ते ३ कॅज्युअल शॉर्टस असाव्यात, जर बीचवर जायचे असेल तर एक अतिरिक्त सेटसोबत असावा सहसा पाण्यात चप्पल, वेट प्रूफ जाड सोल असलेले वापरावेत.

**शर्ट :** कॉटन टी शर्ट सोबत असावेत ज्याचे २-३ सेट असावेत. बीच बीअर - बिकिनी - २ स्वीम सुट्स असावेत. सूर्य प्रकाशात फिरायचे असेल तर हॅट आणि गॉगल्सही असावेत.

**लिंगरी किंवा स्लीप वेअर :** स्ट्रीप लेस ब्रा किंवा स्ट्रेच टॉप आणि सॉक्स, लेगीज सोबत असावेत.

**स्वेटर :** लाईट वेट स्वेटर असावे.

**शूज :** ब्लॅक कलर व लो हिल असे असावेत. एखादा स्पोर्टस् शूजचा सेट देखील असावा. पाण्यात चालण्यासाठी स्पेशल जाड तळव्याचे व रफ सरफेंसचे स्लीपर असावेत. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# आ.शाह यांच्या वतीने रोजगार मेळावा

आधुनिक केसरी




**धुळे :** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत आहे . रोजगार उपलब्ध नसल्याने व्यसनाधीन होत आहे अश्या सगळ्या परिस्थितीचा विचार करून धुळे जिल्ह्यासाठी रोजगार उपलब्ध व्हावा कारखानदारी यावी यासाठी आमदार फारुख शाह यांनी रावेर एमआयडीसी व्हावी म्हणून प्रयत्न चालविले आहेत.तसेच बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी उद्योजक , अस्थापना यांना एकत्रित आणून सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना रोजगाराच्या संधी व उद्योजकांना आवश्यकतेप्रमाणे पात्र / कुशल मनुष्यबळ सहज उपलब्ध व्हावे . याकरीता धुळे शहर आमदार फारुख शाह व जिल्हा कौशल्य विकास रोजगार, मार्गदर्शन केंद्र धुळे यांच्यामार्फत रोजगार मेळाव्याचे आयोजन दि .१२ सप्टेंबर रोजी मारिया हॉल १०० फुटी रोड मायक्रो टॉवरजवळ सकाळी ११ वाजता आयोजित केलेले आहे . या मेळाव्याला महाराष्ट्रातील २० कंपन्या सहभागी होणार आहेत. त्यात सुमारे २ हजार पदांसाठी मुलाखती घेण्यात येणार आहे व त्याच ठिकाणी बेरोजगारांना नियुक्ती पत्र देणार आहेत . तसेच या मेळाव्याला जिल्हा उद्योग केंद्रामार्फत जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगारांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे .

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in